पुणे ग्रंथालय
सं. नं. ५८६१
गीत

# प्रेमदर्शिका नाटिका.

आबालवृद्धांस वाचनार्ह आणि
बोधपर अशी

मोरेश्वर रामचंद्र फाटक

१२५
सं. क्र. ५८६
प्रेमदर्शिका नाटिका.
नाटक

Baroda 26.6.98

Presented to

Marathi Grantha

Sangrahalaya, Thane

by Nagesh V Bapat

संगीत [illegible]

# प्रेमदर्शिका नाटिका.

आबालवृद्धांस वाचनार्ह आणि बोधपर

अशी

**मोरेश्वर रामचंद्र फाटक**

गुजराथी बालबोधिनीचा लेखक आणि वडोदें
राज्यांतील मिलिटरी मेडिकल डिपा-
र्टमेंटचा सबार्डीनेट यानें लिहून
प्रसिद्ध केली ती

पुणें येथें
'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापिली.

सन १८९६ इसवी.

( सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत [illegible] आणे, कलदार.

# प्रस्तावना.

अलीकडे प्राकृत भाषेंत नानाविध उपयुक्त असे पुष्कळ ग्रंथ उदयास आले, आणि येतही आहेत. भाषेच्या उन्नतावस्थेसाठीं होतां होईल तितका प्रयत्न करून प्रत्येक मनुष्यानें ग्रंथांत भर घातली पाहिजे. या कर्तव्यास अनुलक्षून मीं हें " प्रेमदर्शिका " नांवाचें लहानसें पुस्तक जगाच्या पुढें ठेविलें आहे.

ह्या पुस्तकानें, आबालवृद्धांचें कांहीं तरी अंशानें मनरंजन व्हावें ह्मणून हें पुस्तक नाटकाच्या रूपांत गद्यपद्यात्मक रचिलें आहे.

ह्या नाटिकेंत मुख्यतः स्त्रीपुरुषांनीं एकमेकांवर निःसीम प्रीति ठेवून स्वधर्माचरणानें वागण्यांत काय फळ आहे, तसेंच त्यामुळें येणारें प्रसंगावधान आणि प्रसंगावधानामुळें महत्फल कसें प्राप्त होतें हें स्पष्ट दाखविलें आहे. शिवाय दुष्टाचरणानें कसें नुकसान होतें वगैरे गोष्टींचें यथामति दिग्दर्शन केलें आहे.

मे० डाक्टर सीताराम दामोदर पंडित यांची कविताशक्ति चांगली व रसभरित असल्याबद्दल मला माहीत होतें. सुदैवयोगानें सांप्रत काळीं त्यांचा व माझा नोकरीचा संबंध एकेच ठिकाणीं जमून आला. त्यांस ह्या नाटिकेंतील भाग संगीत पद्यांच्या रूपानें रचून देण्याविषयीं मीं विनंति केली व त्यांनींही आपला अमूल्य वेळ केवळ परोपकारार्थ खर्चून ह्या नाटिकेंतील तमाम पद्यरचना संगीत पद्यांच्या धर्तीवर नानाप्रकारच्या रागरागिणींत व तालांत करून दिली. त्यामुळें आंगठीस कोंदण बसविल्याप्रमाणें ही नाटिका रम्यतेस विशेष पात्र झाली आहे. व ह्या त्यांच्या स्तुत्य कृत्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फारच आभारी आहे.

ह्या पुस्तकासंबंधानें एवढेंच लिहितों कीं जगापुढें येण्याचा हा माझा पहिलाच उद्योग आहे. त्यामुळें ह्यांत पुष्कळ दोष असतील, त्यांकडे यावेळीं विद्वज्जन कानाडोळा करून गुणग्रहण मात्र करतील.

आपला नम्र सेवक,

**मोरेश्वर रामचंद्र फाटक.**

॥ श्रीराम ॥

# संगीत प्रेम-दर्शिका नाटिका.

## अंक १ ला.

### मंगलाचरण.

॥ पद ॥

( पंचतुण्ड नररुण्ड मालधर. या चालीवर. )

सूत्रधार—

श्री गोविन्दा सच्चित्सुखदा धांव मुकुन्दा सुखकन्दा ॥ रङ्गभूमिवरि येऊन मज दे नाट्यस्फूर्ती मतिमन्दा ॥ ध्रु० ॥ नन्दात्मज बा गोपिवृन्द तो लागुनि निशीदिनिं तव छन्दा ॥ वृंदावनिं मुरलीरव परिसुनि सोडिति ज्या निजगृहधंदा ॥ १ ॥ राधा-मुख-चंद्रा पाहुनिया घिरट्या घालिसि घरिं तिनदा ॥ हळुच गाल चुचकारि मग

तिचा होसि कसा वा शरमिन्दा ॥ २ ॥ आनंदानें स्तवितों अससी त्रैलोक्याचा पोशिन्दा ॥ पात्रें वदवी प्रेमभरें त्या देऊनि प्रेमाच्या सनदा ॥३॥ वन्दाया टपती वृन्दारक मन्दाकिनि यत्पदिं मन्दा ॥ सिताराम तव पदारविन्दा वंदी निशिदिनिं हा वन्दा ॥ ४ ॥

॥ पद ॥

( अवन करो तुमचें. या चालीवर. )

मंदरगिरिवरधारि मुरारि ॥ हरि कल्याण करो ॥ तुमचें ॥ ध्रु० ॥ निखिल ब्रह्मांडा प्रतिपालक ॥ प्राणिमात्रशरिरीं जो चालक ॥ गोकुलवासि जनांचा मालक ॥ सुंदर दर अरिधारी ॥ तो कंसारि सदा असुरारी ॥ हरि कल्याण करो ॥ तुमचें ॥

अहो विद्वन् मुकुटमणी सभासदहो ! आपणांस ज्या कार्यासाठीं येथें येण्यास श्रम दिले; त्या कार्यास, आतां ईशस्तवन पुरे झालें ह्मणून, प्रस्तावनेनंतर लवकरच आ-

रंभ होणार आहे. करितां इकडे अवधान असावें. (स्वगत) बरें, पण अद्याप—

॥ साकी ॥

राग जोगी, ताल धुमाळी.

करुनि सिद्धता पात्रांची मी त्वरितचि येत्यें ऐसें ॥
कथितां अजुनि कां नच येई विस्मय मनिं वाटतसे॥
विलंब वहु झाला ॥ येथें येण्या मम सखिला ॥१॥

नटी— सदर

आल्यें आल्यें त्वरा कशास्तव बाई इतुकि अहा ती॥
काम धाम आटोपुनि सत्वर येतच होत्यें परती ॥
ऐशी घाइ तरी ॥ करितां कशास बहुत परी ॥१॥

सू०—अगे तुला माहित नाहीं काय ? पहा--

॥ पद ॥

( काय बेट्या हरणाची मजा, या चालीवर. )

शूरमणीच्या प्रथम स्त्रियेची दुहिता उपवर ती ॥

जाहली ॥ सुंदरशा नृपकुमारा ध्याया विचार मनिं करिती ॥ पहागे ॥ तज्जनकाच्या परचक्राचि ये परि राज्यावरती ॥ पहागे ॥ त्या समयीं तो राजपुत्रही न दिसे जरि बघती ॥ पहागे ॥ तोचि आपणा पति व्हावा ही मनिं इच्छा धरिती ॥ पहागे ॥ त्यासाठीं या नंदन–उपवनिं येणार्चि परि ती ॥ पहागे ॥ तरि जावें गे स्वकार्य करुनी येई जों नच ती ॥ पहागे ॥

प्रिये, यासाठीं ती मनास करमणूक करून घेण्यास येथें येणार आहे म्हणून आपणांस आपलें कार्य उरकून लवकर येथून गेलें पाहिजे.

नटी—असं काय ? बरं आतां काय करायचं ?

सूत्र०—प्रिये,हे वसंताचे पूर्ण दिवस आहेत, करितां—

॥ साकी ॥

रंजविगे या सभाजनांतें कोकिल कलरव गानें ॥
वसंत समयीं उचित अशानें शांतवि यांचीं सुमनें॥
कांते त्वरा करी ॥ उत्सुक जन हे सभांतरीं ॥

नटी—फार उत्तम आहे.

॥ पद ॥

( जाहली ज्याची उपवर दुहिता. या चालीवर. )

सुंदर युवती नटुनि वसंतीं । कांत सवें एकांतीं रमती ॥ ध्रु० ॥ सुमन-हार कण्ठीं घालुनिया । केशर चंदन उटी लाविती ॥ १ ॥ मंद सुगंध पवन वाहतसे । चन्द्रचंद्रिका निशि बहु खुलती ॥ २ ॥ मधुप उपवनीं गुं गुं करिती । आम्रवृक्षि कोकिल रव करिती ॥ ३ ॥ बकुल जुई निशिगंध कुंद हीं । जाइ मोगरे गुलाब फुलती ॥ ४ ॥ मदनोत्सव जन सदनीं करिती । वाद्यघोष नगरीं दुमदुमती ॥ ५ ॥

( पडद्यांत गरबी म्हणतात. )

**गरबी.** टिपऱ्याची चाल.

[1]हा वसंत ना पसंत विरहयुत जनां ॥ध्रु०॥ का-

---

1 दादरा.

मकामना मना ॥ [2]तळमळ करि मन राहिना ॥ [2]मदं-
ग पलंगि आलिंगिना ॥ [3]मन्मथसायक सोसतिना ॥
भेटवि कांता करि एकांता ॥ शिण वहु गातांना ॥
रजनि न जाई, करिं वहु घाई, मज सुख नाहींना ॥
[2]हाय हाय करूं गत काय देइ ठाय या दिना ॥
[3]मृदंग सुरंग विन जलतरंग [1]मोरचंग रव मुदविति-
ना ॥ कोकिककलरव मुदवितिना ॥ पुष्पहार मज
मुदवितिना ॥ सिताराम चरणाची दासी ॥ शरण
मि मजवरि करि करुणा ॥ [1]पहा वसंत ना पसंत०

**नटी**—( चमकून ) प्राणनाथ, हा मंजुळ ध्वनि कुठून वरं आला ?

**सू०**—प्रिये, पहाः—

---

१ दादरा. २ केरवानाचाचा ताल. ३ तिताला.

**सूचना**—गरबींतील प्रत्येक चरण दोन दोनदां घोळून म्हणावेत. शिवाय गरवीचे ताल दर्शविले आहेतच, तरी पण त्यांचे सूर कोणत्या ठिकाणीं कसे काढावयाचे या विषयींची माहिती धारी पलटण दुसरीचे डाक्तर मे० सिताराम दामोदर पंडित यांस विचारल्यास म्हणण्यास फार सुलभ जाईल.

॥ पद ॥

काय मला भूल पडली. या चालीवर.

मधुर गान परिसुनि तव तुष्ट जाहली ॥
घेउनि निज मैत्रिणीस दर्शिका अली ॥ ध्रु० ॥
पहा जणूं मज दिसते विपिन-देवता ॥
उचित नसे राहणेंचि या स्थळीं अतां ॥
जाउं गडे अन्य स्थळिं क्षण न लागतां ॥
आलि पहा नीटचि जणुं वीज चमकली ॥ १ ॥ मधु० ॥

( नटी व सूत्रधार जातात. नंतर पडदा उघडतो. तेथें दर्शिका, दासी आणि सख्या यांसहवर्तमान पूर्वोक्त गरबी मंडळावर गाते. गरबी आटोपल्यानंतर सर्व सख्या तिचा निरोप घेऊन जातात; आणि दोन दासी मात्र फुलें तोडण्यास लांब जातात. नंतर )

दर्शिका :—( व्याकुळ होऊन स्वगत )

॥ पद ॥

दादरा, कालंगडा, "मदना चंद्रा सुवैरी" ही चाल.

देवा कशिरे, करुं गत मि अहा ॥ ध्रु० ॥ स्मर

शर छेदित, यौवन वन नित, न सहे दुःख महा ॥
खचितचि ॥ १ ॥ सुंदर मूर्ती, प्रेम मम पती, त्या-
विण दीन पहा ॥ जाहल्यें ॥ २ ॥ तो प्रिय स्म-
रशर-भेदचि सत्वर; करिता शूर महा ॥ खचि-
तचि ॥ ३ ॥ असता तो जरि ह्या समयीं तरि,
अर्पित्यें काय चि हा ॥ तयासी ॥ ४ ॥

( नेपथ्यांत )

हेतु तुझे पुरविल जगदीश्वर, संप्रति स्वस्थ रहा ॥
कौतुकें ॥ ५ ॥

दर्शिका—

॥ पद ॥

( अर्जुन तर संन्यासी होऊनि, या चालीवर. )

मम संतापा दूर करीसा ध्वनि कोठून आला ॥
अहाहा ध्वनि कोठूनि आला ॥
हेतु मनींचे आजचि पुरतिल ऐसा भास मला ॥ध्रु०
तरि ज्यानें हें उत्तर दिधलें तो प्रिय मज गमला ॥

दर्शन देउनि अभयचि देवो तो मज भीरूला ॥१॥

प्रेम ( माळ्याचा नोकर )—( बाहेर येऊन पूर्वोक्त " हेतु तुझे " ह्मणतो ).

( इतक्यांत दासी तरलिका व लवंगिका येऊन ).

तरलिका व लवंगिका—( प्रेमास ).

॥ पद ॥

" मजवरती खचित आहे " या चालीवर.

वाटेना लाज कैशी तुज येथें यावया ॥
एकांतीं बाइसाहेबाशीं बो–लावया ॥
गेलों कीं आह्मि होतों कुसुमें तो–डावया ॥
गमतोसी मूर्ख आह्मां नच धरशी तूं भया ॥१॥

प्रेम—

॥ साकी ॥

बोलूं नकोगे व्यर्थ मला तूं आलों नच ऐसा मी ॥
स्वामिंणिनें तव केलें मजला पाचारण या कामीं ॥

यास्तव आलोंगे ॥ तुह्मां कां मूर्खच गमलों गे ॥१॥

तर०—

जा जा येथुनि निघ नाहीं तर खाशिल मारचि

आतां ॥

प्रेम—

जागे वटकी कर जा जा तूं काय करिशि मी येतां ॥
मज तूं भिवविशि कां ॥ नच भीइन मी तव जनका ॥१

( असें बोलून निघून जातो. )

द०—अग तरलिके, तूं काय म्हणून त्याला घालवून लावलंस ! मला किनई त्याच्यापासून या बागेंतल्या कांहीं चमत्कारिक वनस्पतींची माहिती करून घ्यावयाची होती !

तर०—बाईसाहेब, आपणासारख्यांनीं हलक्या मनुष्याबरोबर आणि एकांतीं तर बिलकूलच बोलतां कामा नये.

द०—अग हा उपदेश किनई अज्ञान राजकन्यांच्या

कामाचा. मी अज्ञान नाहीं हो! समजलीस! मला त्याचें जरूर काम आहे. मी खचित सांगतें कीं, तो माळी नसून कोणी तरी सत्कुलोत्पन्न धूर्त मनुष्य असावा! असो. त्याला शोधून घेऊन ये जा. मी पलीकडच्या लतामंडपांत बसत्यें.

तरलिका व लवंगिका—( दूर होऊन एकमेकींत स्वगत ).

॥ झंपा ॥

" मुला सांग नृपतीस संदेश " या चालीवर.

मुलें हट्टि कीं असति तीं थोर घरचीं ॥ सत्य सद्भाषणीं धरति अरुची ॥ ध्रु० ॥ काय करूं उदर परिपूर्ति साठीं पहा । तदभिमत आज्ञा स्वशिरिं धरुनी ॥ चालणें ना तरी सहज इतराजि ती । व्हावयाची वळेंचि पथ करुनी ॥ मुलें हट्टि० ॥

जावें तर त्यास शोधून आणण्यास.

( जातात ). पडदा पडतो.

## प्रवेश २ रा.

### स्थळः—ह्याच बागेंतील माळ्याचें घर.

**माळी**—ह्यं बग त्यो परेम अन् त्येची आय इथ आल्यापून आपनास्नी लई व्येस दीस आल्या ती. म्हूनशान सांगतों कीं, त्यास्नी वली कोरडी भाकर पोटभर देन्यास कसर करूं नकोस हां.

**माळीण**—मना अक्शी सांगाया नुको. मी म्होटी धूरत बायकु हाय्ये. मना समदं समजतं हाय्ये,

**मुलगा**—खरंच दादा, त्यो परेम इकता चांगला हाय म्हून सांगूं तुमास्नी ! मना मोट हकाया लागतु अन् बैलासनी पानीबी पाजाया लागतु नी काय काय जंमत जंमत करतुया ! त्येनी किनइ परौच्या दिशी मोट हाकतांना योक गानं म्हटलं; लई व्येस बाबा ! त्यें म्हनुन दाखवुं काय ?

**माळी व माळीण**—म्हन म्हन बगूं.

## लावणी. वालेघाटी.

" आईबाप वहिन धाकटी " या चालीवंर.

मुल०—

दिनभर मेहेनत करुन धन्याची बैल मोट वहाती ॥ थकले म्हुन कोना सांगती ॥ हे जी जी जी ॥ धनि माझ लै उपकारी वग जेव्हां सांज पडती ॥ हाति धरुनी दाना घेती ॥ हे जी जी जी ॥ निरासरित जनु बघुनि आमासी, घरिं आसरा घेती ॥ कोंडिवालि भाकर खा म्हनती ॥ हे जी जी जी ॥ सदा सुरक्शित राखो त्येला, लक्शुमिचा पती ॥ देवा माजि ऐका इनती ॥ हे जी जी जी ॥

माळी—लइ ग्वाड वरं बाळ्या. आतां असं कर; त्येला न त्येच्च्या मातुसरीला न्येरी करायास घेऊनशान बिगी बिगी ये. जा बिगुन.

( मुलगा जातो. )

**माळी**—य मांगारनी मना वाटतं ती कुनीबी चांगलीं मानसं असावींत. तुना कसं वाटतं ?

**माळीण**—मना असं वाटतं या, त्यो कोनी तरी राजबिंडा असावा ! परोचा पराकरम न्हाय म्हाईत तुमास्नी ? त्यो पोर व्हता म्हुन सारं ठ्येस झालं ! न्हाइ तर त्यो वाघ कुनीबी मारताना !

**माळी**—खरंच. बरं पन, तीं दोघं आजून न्हाईं आलीं तीं ? ( इतक्यांत मुलगा येतो. )

**मुलगा**—बाबा, तीं दोघं कुठं दिसलीं न्हाय ! तुमी जाऊन त्येना गवसून घेऊनशान या.

**माळी**—बरं तर मी घेऊन येतों त्येना. ( जातो ).

**मु०**—आई.

**लावणी.** बालेघाटी.

" येथून तुझं बरं व्हईल ह्ये दाजी " या चालीवर.

**आइ ग, कर माझं लगीन, व्हय दाजी २ ॥ मंग मी तिच्या संग जेवीन, व्हय दाजी २ ॥ घोड्या-**

वर, तिला घेऊन मिरवीन व्हय दाजी २ ॥ तुना जसा मांगारिन म्हनुन बाबा हाक मारी ॥ तसा मी तिला हाक मारीन ॥ व्हय दाजी २ ॥

**माळीण**—( मनांत ) काय मेला सोदा. ( उघड, त्याचा मुका घेऊन ) करूं बरं बालाचं लगीन.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळः—तोच बाग, फुलझाडांचे ताटवे.

---

( दासी प्रेमाची म्हटलेली आई फुलें तोडतांना )
दासी प्रेमाची आई०—

॥ पद ॥

( जाते कीं मम शकुंतला, या चालीवर. )

अजुन किती तरी दिन दुःखाचे असती ते अमुचे॥

नकळे बाई दैव कसें तें फिरलें कुमराचें ॥ ध्रु० ॥
परचक्रीं परलोकीं गेली जननी सोडुनी ॥
दोहों वर्षांचा असतां तेथुनि आल्यें घेऊनी ॥१॥
द्वादश वर्षें होऊन गेलीं कंठित दिन रजनी ॥
वृद्धपणीं मज शक्ति न फिरत्यें मी कष्टें करुनी॥२॥
माझें कांहीं विपरित होतां काळजि कोण करी ॥
जगदीशा तद्राज्य तयासी देउनि सुखिच करीं॥३॥

प्रेम—( वऱ्याच अंतरावरून दासीला फुलें तोडतांना पाहून )

॥ पद ॥ पिलु.

कष्टतसे मम जननी फारच मजसाठीं किति ही ॥
शरिरीं ज्वर अति दुःसह परि ती न गणी त्या-
ला ही ॥ ध्रु० ॥ काळजि वाहतसे मम तनुची
रात्रंदिन पाही ॥ ऐशा स्थिति मधीं राहुनि इज-
ला कष्टविणें कांहीं ॥१॥ दावावी चतुरता जना-
ला शौर्य धैर्य यांहीं ॥ उच्च दशा मिळवावी स्व-
वळें अन्य मार्ग नाहीं ॥ २ ॥ काल रोजिं भे-

**टली उपवनीं सुंदरि मज दाही ॥ तीस वरावें पुरवी देवा इच्छा लवलाही ॥ ३ ॥**

चला तर मातुश्रीस विचारून आजच प्रस्थान ठेवावें. ( तिजकडे जावयास लागतो. इतक्यांत तीस सर्पदंश झाल्यामुळें )

**दासी**—अरे प्रेमा! अरे रामा! धांव धांव लवकर, सर्पानें मला दंश केला! ( असें ओरडते )

( तें ऐकून प्रेम तिजपाशीं धांवत जातो. आणि तिला मूर्छित पाहून )

**प्रेम**—हायरे दैवा! काय हें त्वां अनुचित कर्म केलें! ( तिजकडे पाहून ) आतां मला वारंवार प्रेमानें प्रेम प्रेम ह्मणून कोण हाका मारील! देवा! नारायणा! म्यां बालकानें तुझे असे कोणते अपराध केले होते, कीं त्यामुळें वज्रपातापेक्षांही कठिण असे दुःखपर्वत मजवर कोसळताहेत! आई ग आतां मी काय करूं! या समयीं माळीदादा लवकर येईल तर फार बरें होईल! ( ती जास्त मूर्छागत पाहून ) आई ग असं काय करतेस! आतां काय करूं! देवा धांव! ( रडतो ).

**दासी**—( अमळ सावध झाल्यावर ) लाडक्या प्रेमा, बा घाबरून काय करावयाचें आहे! देहदण्ड दिला पाहिजे, हें तूं जरी लहान आहेस तरी सर्व समजतोस! याकरितां बाळा! शेवटचीं जीं मी दोन प्रेमाक्षरें सांगत्यें तीं स्वस्थचित्तानें ऐकून घे, आणि त्याप्रमाणें वाग. ह्मणजे त्यांत तुझें कल्याण होईल. पहा:—

" थाट माट सदनीं नवा " या चालीवर.

**बाळारे निज शरिरा जपत जा अतां ॥ उदय तुझा होईल बा शीघ्र तत्त्वतां ॥ ध्रु० ॥ कोणावर कधिं हि न विश्वास ठेवणें ॥ शत्रूच्या वचनीं त्वां नावलंबणें ॥ सततोद्यम करुनि सत्य कधिं न सोडणें ॥ पंच प्राण जाउं पाहति दे रजा सुता ॥ १ ॥**

बाळा, येत्यें बरं! राम! राम!! राम!!!

**प्रेम**—(दुःखित होऊन बसतो. इतक्यांत माळी येतो.)

**माळी**—अव परमाजी चला किवो न्येरोला! अव अस काय बसलात राव ढिल्यावानी!

**प्रेम**—( दुःखोद्गार काढून ) कसली न्याहारी आणि कसलें काय! माझें दैव फुटलें!!

**माळी**—( आश्चर्यानें ) असं झालंया तरी काय? ह्मातारी कां निंजलीया!

**प्रेम**—दादा, काय सांगूं! इला सर्पदंश झाल्यानें हिनें देह ठेविला! हाय हाय!! ( रडतो ).

**माळी**—आऱ्याऱ्याऱ्या! लइ वंगळ झालंया! उगा, नका रडूं. इश्वेराची मरजी! त्येच्या ह्मोरं कोनाचं चाल-तंया? चल आतां इची बिगी बिगी तयारी करूं.

**प्रेम**—दादा, आतां तुम्ही जाऊन सर्व सामान पाठवून द्या ह्मणजे मी इला अग्निसंस्कार करीन!

**माळी**—बरं तर. ( जातो )

**प्रेम**—मी पण पलिकडल्या तुळशींच्या वाफ्यांतून तुळशींचीं काष्ठें आणण्यास जातों.

( जातो. पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४.

### स्थळः—मोदपूर—राजवाडा अंतःपूर.

**राणी दुःशीला.**—कुसुमावती, तूं तर आतांशा फारच शेफारली आहेस बरं का! पण म्हटलं माझ्याशीं गांठ आहे! इकडचं मुस्कड तिकडे करीन, ठाऊक नाहीं वाटतं!!

**कुसु०**—बाईसाहेब, असं रागवायला मीं काय बरं केलं? उगीच संतापावं ह्मणजे काय!

**राणी**—तोंड करतेस का आणखी! काल संध्याकाळीं त्या राम्याशीं कसलेग रस पाघळत होते?

**कु०**—( शरमून ) बाईसाहेब रागावूं नका. चुकीनें कांहीं कोणापाशीं उगीच थट्टेनें बोललें असेन.(पदर पसरते.)

**राणी**—मग मीं महाकालीच्या पुजाऱ्यास बोलावणें पाठीव ह्मणून सांगितलं होतं; पाठविलंस का बोलावणं?

**कु०**—खरंच बाईसाहेब, मी अगदीं विसरलें पहा कशी तीं, राम्याशीं बोलण्याच्या नादांत!!

**राणी**—समजलीस आतां. कशी चवचाल झालीस तूं ती?

कु०—बाईसाहेब, मी अपराधी आहें. याबद्दल आपणापाशीं क्षमा मागितली आहे. आतां त्याला बोलावणं पाठवित्यें. ( बाहेर जाऊन येत्ये. ) पाठविलं बरं बोलावणं. ( लघळपणानें ) बाईसाहेब, मी कशी तरी आहें, पण मला आपण संभाळून घेतली आणि घेतां आहां. म्हणून म्हटलं ही दासी आमरण आपले चरण सोडावयाची नाहीं.

रा०—पहा मेली माणसांना कशी वळवून घेते ती! बरं पण कोण गेलं आहे पुजाऱ्याला बोलावणं ?

कु०—आपले सद्गुनाईक. बरं पण बाईसाहेब, आज त्याला कां बरं बोलावण्याचं होतं आहे ? मला नाहीं बाई यांत उलगडा पडत! या दासीला नाहीं का कळवायचं ?

राणी—अग नाहीं कसं! तूं तर माझा उजवा हात आहेस. पहाः—

॥ दिंडी ॥

**दर्शिकेचें होतांचि लग्न द्यावें ॥ अर्ध राज्य असें मम पतीस भावे ॥ नेत्रिं सलते ती केर जसा कांहीं ॥ होइन नांवाची करिन ठार पाहीं ॥१॥**

**द्वारपालिका**—सरकार, दारावर महाकालीचे पुजारी आले आहेत.

**राणी**—त्यांना आंत घेऊन ये. ( कुसुमावतीस ) बाहेर गैर रावता असूं दे.

**पुजारी**—( नमन करून ) राणी सरकारचा सदां विजय असो. महाराज दासावर अनुग्रह करण्याचें प्रयोजन काय कारणानें पडलें ?

**राणी**—कारण तें काय असायचं ! मीं म्हटलं, आपलं घराणं पडलं मोठं. आणि आपल्या वाडवडिलांपासून आपण सरकारची इमानें इतबारें नोकरी करीत आलां. ह्मणून वाटलं मनाला कीं, त्यांना एकदां बोलावून वेतनाबितनाविषयीं विचारावं. मग कसें काय, वर्षासन कुटुंबास पुरेसें वेळचे वेळीं मिळतेंना ?

**पुजारी**—हें काय विचारावें सरकार ! आपणांसारखीं रत्नें गो-ब्राह्मण प्रतिपालक असल्यावर कुठें न्यूनत्व राहील काय ?

**राणी**—बरं तर, पण शास्त्रीबुवा मी एक तुम्हाला काम सांगणार आहें. हो, किती झालं तरी आपण जुने नोकर आमचे ! ह्मणून विश्वासाचं काम आपणाशिवाय दु-

सऱ्यास सांगतां येणार नाहीं! मग कसं काय, करायचंना?

**पुजारी**—पण सरकार, असें कोणतें काम या दासा-कडून करवून घेणार? तें कळल्याशिवाय म्यां काय सांगावें?

**राणी**—हें पहा शास्त्रीबुवा, काम कांहीं फार नाहीं! पण अमळ जोखमीचं आहे! तें केलंत ह्मणजे दहा हजार मोहरा बक्षीस देईनच; परंतु सध्यां हा बहुमोलाचा हार देत्यें तो घ्या. (हार देते)

**पु०**—(हार घेऊन आनंदानें) हा कशाला! आप-ल्या अन्नानें मी पोसलेलों आहे. मला सरकारची नोकरी बजाविलीच पाहिजे. हुकूम व्हावा ह्मणजे झालें.

**राणी**—शास्त्रीबुवा, ह्मटलं! काम फार नाजूक आहे! षट्कर्णी झालं न पाहिजे.

**पु०**—भलतेंच! अजून ह्मटलें या शास्त्र्यांच्या स्व-भावाची पारख सरकाराला झाली नाहीं तर मग! याला काय ह्मणावें! दुर्दैव माझें, दुसरें काय?

**राणी**—तसं नाहीं हो. असो, आतां मी आपणास काम सांगतेंच. पण प्रथम बेलभंडार झाला पाहिजे (भं-डार पुढें करते)

पु०—हात्तेच्या येव्हढेंचना! सरकारचे कामीं शीर गेलें तरी बेहेत्तर आहे ( भंडारा उचलतो )

राणी—( हळूच ) दर्शिका आहे किनई, तिला या जगांतून नाहींशी करायची अगदीं.

पु०—( विचार न करतां ) बरें आहे. पण कशा रीतीनें?

राणी—हें पहा, उद्यां मी तिला कालीच्या मंदिरांत पूजेसाठीं पाठवीन. मग ती तेथें आल्यावर तिला, आज व्यतिपात पर्वणी आहे, ह्मणून बाणगंगेवरून स्नान करून ये, असं सांगा.

पु०—बरें मग पुढें?

राणी—ती स्नानाला गेली, ह्मणजे कोणातरी पाणबुड्यास सांगून तिनें बुडी मारली कीं, तेथेंच तिचा पाय धरून खोल पाण्यांत नेऊन बुडवावी! अशी तजवीज करा ह्मणजे झालं. आपलं कार्य होऊन तिला मगरानें नेली असं होईल.

पु०—सरकार, खरोखर अकलेची तोड सांगितली! आतां आपण स्वस्थ असावें. मी रजा घेतों.

राणी—या तर. पण संभाळा हो!

पु०—हरकत नाहीं. (स्वगत एकीकडे) पहा या कौटाळणीनें कसें मला गोड गोड बोलून बांधून घेतलें तें! आतां हिच्या हुकुमाप्रमाणें जर मीं काम केलें नाहीं तर ही अवदसा कांहीं तरी लटकें कुभांड रचून माझीं मुळेंन् मुळें खोदून टाकवील! बरें, करून जर कां उघडकीस आलें तरी पण बारा वर्षें पुरींच झालीं ह्मणून समजावें! काय करावें, इकडे आड तिकडे विहीर! (विचार करून) हें राक्षसी कृत्य केल्यावांचून सुटका नाहीं हें तर खासच. मग आज इतकी रक्कम मिळणार ती कां बुडवावी. पैसे घेऊन मरणावर बेतेल तें चांगलें. पोरांबाळांचें तर कल्याण होईल! मग फुकटंफाकट मरण्यांत काय अर्थ आहे! (जातो.)

**द्वारपालिका**—सरकार स्वारी येत आहे.

**राणी**—(ऐकून सचिंत बसते)

**राजा**—(पाहून) अरे, हें काय! आज प्रियकरणी सचिंत कां बरें! (जवळ जाऊन) प्रिये!

**॥ विहाग ॥**

(लक्ष्मीसम चंचल. या चालीवर.)

**कां उदास आज अशी दिससि तूं सये ॥ काय**

काज न कळे मज अलिकडेस ये ॥ ध्रु० ॥ कोणि तुला दुःख दिलें ॥ तुजला अवमानियलें ॥ छळिलें कीं विटंबिलें ॥ सांग सखे जें जाहलें ॥ शिक्षा त्या देहांतचि करिन गे प्रिये ॥ कां उदास० ॥

**राणी**—प्राणनाथ, मला त्रास देईल असा जगतांत कोण आहे! माझ्या उदासीनतेचें कारण, जें आपणांस आहे, तेंच आहे. आपण विवेकानें दाखवीत नाहीं आणि मला रहावत नाहीं!

**राजा**—पण असा संदिग्ध जाब काय ह्मणून?

**राणी**—प्राणनाथ, दर्शिकेचं आतां लग्न लवकर कसं होतं, या चिंतेंत आपलं मन रात्रंदिवस नसतं का?

**राजा**—हो खरेंच. अजून प्रेमाचा थांग लागत नाहीं ह्मणून तूं ह्मणतेस तशी माझी अवस्था आहे खरी. काय करावें, कांहीं उपाय सुचत नाहीं!!

**राणी**—गेल्या रात्रीं अगदीं पहाटेस मला किनई एक स्वप्न पडलं; काय बाई! फारच चांगलं स्वप्न हो! जशी काय आपली कुलस्वामीण ही आपल्या इथं आली आहे, आणि ती प्रिय दर्शिकेच्या लग्नाची स्वतः तयारी करते

आहे! यावरून मला तर वाटतं कीं, खचीतच प्रेमाशीं तिचं अवचित लग्न होईल! यावद्दल मला चांगला उपाय सुचला आहे. करून पहावा. हो, कोणत्या तरी उपायानें दर्शिकेस तिच्या योग्य पति लवकर मिळो ह्मणजे झालं!

**राजा**—प्रिये, खरोखर तूं कारणिक वायको आहेस. काय उपाय आहे, सांग वरें!

**राणी**—प्राणनाथ ऐका,

( सुटला पितृदिशेचा वारा, या चालीवर. )

**वरवा उपाय मज सुचला, असावें अनुमोदन मजला, लाडक्या वाइ दर्शिकेला, महाकालि मंदिरीं पाठवा सखिसह पूजेला ॥ १ ॥ करितां अराधना देवीची, होईल कृपादृष्टि वहु तीची, करिलचि पूर्ण मनोरथ साची**

**राजा—गमलें वचन तुझें मज करि जा, रुकार तुज दिधला ॥ २ ॥**

**( इतक्यांत दर्शिका येते )**

**दर्शिका**—( उभयतांस पाहून ) वः

महाड. ताल दादरा.

सुदिन आज खचित बाइ गमतसे मला ॥ उभ-
यतांहि जननि पिता भेटती मला ॥ ध्रु० ॥
( जवळ जाऊन ) करितसें प्रणाम तुह्मां तुमचि
लाडकी । इच्छितसे सतत तुमचि प्रीति सारखी ॥
राणी—मिळुनि पती शीघ्र तुझा होइगे सुखी ।
राजा—हो अखंड वैभव सौभाग्य हीं तुला ॥
द०—सुदिन आज० ॥

राजा—बाळे ये अशी बैस. तब्यत चांगली आहेना?

द०—माझी प्रकृति चांगली आहे. पण आपणां उभयतांचीं मनं सचिंत कां बरं दिसतात ? कारण काय तें मला सांगितलं पाहिजे.

राजा—बाळे, तुझें वय आतां पतिगृहीं पतिसहवासांत आनंदानें रहाण्याचें असतां अद्याप तुझा विवाह होत नाहीं, या काळजींत आहोंत आह्मी ! काय करावें ! प्रेमाचा शोध हरतऱ्हेनें केला; पण कांहींच थांग लागत नाहीं !

द०—बाबा, याला आपला काय उपाय? माझं प्रे-क्तन, दुसरं काय !

राजा—बेटा, अशी अधीर होऊं नको. ही तुझी माता तुझ्या करवीं कांहीं उपाय करविणार आहे, त्याप्रमाणें त्वां करावेंस. त्यांत कुळस्वामीण यश देईल.

द०—फार उत्तम आहे बाबा. आई:—

राणी—बये ऐक. उद्यां मंगळवार व्यतिपात आहे, ह्मणून महाकालीच्या मंदिरांत जाऊन पुजारी सांगतील त्याप्रमाणं कालीचं यथासांग पूजन कर. शेवटीं अशी प्रार्थना कर कीं, जय माते कुळस्वामिणी या गरीब अबलेवर कृपावंत होऊन, ज्या प्रेमसिंहाबरोबर माझं लग्न होण्याचा वाङ्‌निश्चय झाला आहे, त्या प्रिय प्रेमाचा लवकर शोध लागून त्याच्याशीं माझं लग्न व्हावं; असा आशीर्वाद मिळावा. आणि तसं झालं ह्मणजे १०८ सुवासिनींना तुझ्या नांवानं सौभाग्यवायनं देईन, असा नवस करून लवकर परत यावंस. बरोबर सीमंतिनीला ने. समजलीस ?

द०—हो. आज्ञेप्रमाणें करण्यास मी तयार आहें.

राजा—प्रिये, आतां मी दरबारांत जातों.

द०—माते, मी पण उद्यांकरितां सामानासुमानाची तयारी करण्यास जातें.

राणी—बरं आहे.

द०—( जाते )

राणी—( स्वगत )

॥ साकी ॥

येथवरी मम कार्यभाग तर निर्विघ्नपणें झाला ॥
पुढची तरतुद अधींच केली चिंता न मनीं मज-
ला ॥ आतां मी जात्यें ॥ पाहिन पुढतीं होईल तें॥

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

### स्थळः—मोदपुरी मार्ग.

---

प्रेमसिंह—देवाधिदेवा नारायणा! मीं असा काय बरें तुझा अपराध केला होता! बाळपणींच माझीं माता-

पितरें इहलोक सोडून गेलीं! पुढें कांहींसें पुण्य पदरीं होतें ह्मणून, त्या सुवदना दासीनें, त्या घोर प्रसंगांतून मला काढून केवळ पोटच्या गोळ्याप्रमाणें किंबहुना प्राणांपेक्षांही अधिक लडिवाळपणानें, आज १२ वर्षें माझें संगोपन केलें! पण देवा! तेंही तुझ्या मनास न येऊन तिजवर कींरे घाला घातलास! हाय! हाय!! आतां मी पोरका झालोंना? शिव! शिव!! शिव!!! (विचार करून) असो. अशासमयीं शोक करीत बसलों तर, बाळा उगा, नको रडूं, असें कोण म्हणणार आहे? कोणी नाहीं. (वर पाहून) बरें तर, आतां अगदीं दोन प्रहर झाले आहेत ते ह्या समोरच्या मंदिरांत टाकून मग पुढचा रस्ता कापावा. (मंदिरांत जातो) अरे वः हें तर महाकालीचें स्थान दिसतें! चला तर प्रथम दर्शन घ्यावें. (दर्शन घेतो)

## ॥ पद ॥

झंपा. "मुला सांग नृपतीस" या चालीवर.

**नमो आदि माये नमो कात्यायनी ॥ ठाव दे चरणिं अंबे भवानी ॥ ध्रु० ॥ सुर मनुज उरग**

पशु पक्षि अणि जलचरां ॥ मोहिशी आत्ममा-
या पसरुनी ॥ करविशी त्यां करविं विविध क-
र्में किती ॥ देखतां येतसे हृदय भरुनी ॥ नमो०
॥ १ ॥ वर्णुं किति अमित महिमा तुझा अल्प
मति ॥ दीन तव दास मी पाहि नयनीं ॥ पुर-
वुनी हेतु मम अंतरींचे जननि ॥ दास्य दे मज
सिता-राम चरणीं ॥ नमो० ॥ २ ॥

( दर्शन घेऊन सभामंडपाचे मागचे सोप्यांत विश्रांति घेण्यास अंग कलंडतो, इतक्यांत पुजारी आणि दोन पाणचुडे मारेकरी येतात. )

**पुजारी**—पण गड्यानों, प्रथम तुह्मीं शपथ घेतल्याशिवाय मी कांहीं सांगणार नाहीं.

**प्रेम**—( ऐकून आश्चर्यानें ) हें काय बरें असावें! ज्याअर्थीं हा पुजारी त्यांनीं शपथ घेण्यासाठीं येवढी अट धरतो आहे, त्याअर्थीं ह्या भामट्यांपासून हा कांहीं गुप्त काम करविणार आहे असें वाटतें! असो, पुढें काय बोलतात तें सर्व लक्ष देऊन ऐकलें पाहिजे.

**मारे०** ( २ )—ही आमी देवीची आन वाहतों. मंग झालंना?

पु०—हें पहा, दर्शिका राजकन्या आहे किनई, ती उद्यां सकाळीं १० चे सुमारास गंगेवर स्नानास येईल.

मारे० ( १ )—यइल ! मंग ?

पु०—सांगतों ऐका. ती गंगेंत स्नानास उतरतांच तुह्मी असें करा कीं, ती पुन्हां बाहेर न येई.

मारे० ( २ )—म्हनजी ?

पु०—अरे वेडप्या, अजून नाहीं कां समजलास ? तिला बुडवून मारून टाकावयाचें.

मारे० ( २ )—कुनी ?

पु०—तुह्मीं.

मारे० ( २ )—अऱ्याऱ्या ! ह्यें काय सांगतांवं तुमी बरमदेव होऊनशानी ! लई ठग दिसतांवं तुमी. आमापून शपत घेववून ह्यें असलं वंगाळ काम कराया सांगतां व्हय ?

मारे० ( १ )—अर जार भेकडा, ह्यामंदी कसलं वंगाळ काम आलंया ? अर ह्यो तर आपला धंदाच हाय !

पुजारी—खरेंच, चांगलें बोललास तूं. अरे, मला वाटतें त्याला शूरमणीची भीति वाटली असेल; दुसरें काय!

**मारे० ( २ )**—मी भितुया. पन ह्यें काम न्हइ व्ह-नार मापून.

**मारे० ( १ )**—मंग शपत कशापाई घेतली परथम? आन आतां असं म्हनतोस, लाज न्हाई वाटत ? कुलाला बट्टा लावून घेतोस व्हय ? ( पुजाऱ्यास ) काय न्हाई व म्हाराज, ह्यचं काय ऐकता ! पन आमास उपाव सांगा कसं मारावं त्येचा.

**पु०**—असं करा. ती पाण्यांत उतरण्याच्या संधीस तुह्मी पाण्यांत बुडी मारून बसा; आणि ती पाण्यांत उ-तरतांच तिचा पाय धरून, खोल पाण्यांत नेऊन तिला बुडवून टाका ह्मणजे झालें ! असें केलेंत ह्मणजे मी तुह्मां-ला पांच हजार रुपये देईन.

**मारे० ( १ )**—लई ब्येस.

**मारे० ( २ )**—त्यें काइ न्हाई. या बामनाचा का-य इसोस ! जो आपल्या धन्याच्या पोरिवर उटला, त्यो काय मंग आपनास दाद घेनार ! जर अडुगर रुपये घे-साल तर मंग आमी ह्यें काम करूं. साफ सांगतुया.

**पु०**—येवढेंचना ! हे घ्या रुपये ( रुपये देतो ) पहा बरं ! काम बिनबोभाट झीलं पाहिजे.

**प्रेम**—( स्वगत ) हा दुष्टा, ब्राह्मणाधमा ! काय हें नीच कर्म त्वां आरंभिलें आहेस ! हा दुष्ट त्या बापड्या राजकन्येवर कां बरें उठला ! याचें कारण काय तें बाहेर आलें नाहीं ! बरें कदाचित् पुढें निघेल.

**मारे० ( २ )**—म्हाराज, आतां आमांस तें काम केल्याबिगर सुटका न्हाइच अन आमी तें करनारच. शिवाय आमी शपत पन वाहिली हाये. म्हुन म्हनतों, दर्शिकेस कशापाई मारायची ? तुमच्या कुलाचा धर्म हाये व्हय ?

**पु०**—अरे वेडप्या असला कुठें कुळधर्म असतो का ? हें पहा, दर्शिकेला सावत्र आई आहे, हें तुला माहीत आहे कीं नाहीं ?

**मारे० ( २ )**—व्हय आहे, मंग ?

**पु०**—मग काय ? शूरमणीच्या मनांत तिचें लग्न प्रेम नांवाच्या राजपुत्राशीं करून अर्धें राज्य तिला द्यावयाचें असें आहे.

**मारे० ( २ )**—बरोबर हाये. त्येला पोरगा न्हाई म्हनुन जावयास देत असेल. वावगं न्हाइ !

**पु०**—तें खरेंरे ! पण तें दुःशीलेला न आवडून तिनें

तिला मारून टाकविण्याची ही खटपट केली आहे! आणि मजकडून प्रथम भंडारा उचलवून मला हें घोर कर्म करण्यास तिनें प्रवृत्त केलें!

**मारे० ( २ )**—तुमी कसं पतकरलंत ?

**पु०**—काय करूं! एक तर भंडारा उचलला. दुसरें, तिचें न ऐकितों तर ती कृत्या भलतेंच कुभांड उठवून माझें मूळ खोदून काढती! शिवाय तिनें प्रथमच ( हार दाखवून ) हा पहा, हा बहुमोल हार दिला! आणि काम बिनबोभाट पार पडलें ह्मणजे दहा हजार मोहरा बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे! ह्या लालचींत पडून मीं हें काम करण्याचें पत्करलें आहे. पहा, असें कांहीं अचाट कर्म केल्याशिवाय लक्ष्मी मिळत नसते! ह्मण आहे ना, " अचाट बुद्धि चालवावी नी बळेंच लक्ष्मी मिळवावी "!

**मारे० ( २ )**—( एकीकडे ) हा मूर्का, अशी बूध चालवून कुटं लक्षीमी मिळत असते! उलट तिची भईन मात्र घरास येती.

**प्रेम**—( स्वगत चमत्कारिक वृत्तीनें ) ईश्वरा! तुझी लीला अगाध आहे! जिच्यासाठीं माझें हृदय पोळत आहे, ती स्वतः आणि तिचा जनक माझा संबंध जुळवूं

पाहतात! आणि तिची सापत्नमाता दुष्ट बुद्धीनें राज्याभिलाषानें प्रियेचा अर्थात माझा नाश करण्यास उद्युक्त होते! ( त्वेषाच्या मुद्रेनें ) कांहीं चिंता नाहीं. पहातो हा ब्राह्मण आणि हे रामोशी उद्ईक माझ्या प्राणावर कसा हल्ला करतात ते! ( शांत होऊन ) उद्यां आपणाला येथें वेळेवर हजर असलें पाहिजे. तर आतां परतच माळीदादाकडे जावें. ( जातो. )

**पु०**—आतां माझी पुजेची वेळ झाली, मी जातों, तुह्मी आपलें काम संभाळून करा; बरें का!

**मारे० दोघे**—जी व्हय म्हाराज! अगदीं काळजी करूं नगा, आमीबी तमाकू खाऊनशान जातों.

**पु०**—( जातो )

**मारे० दोघे**—( टिचक्या वाजवून आनंदानें. )

॥ छक्कड ॥

" उठा बसा बोला चाला," या चालीवर.

**बरं झालं झालं बरं झालं। झालि माते तुझी सोनपावलं ॥ ध्रु० ॥ बापाजल्मी कंदि आमी। नाय पाह्यला यवडा ऐवज ॥ १ ॥ धंद करूं पोटं भरूं।**

मारूं मजा अतां सहज ॥ २ ॥ करन नग घात अतां । नग देन कुनासी तरास ॥ ३ ॥ कसा बामन भाडखाऊ । माते करग त्येचा सत्या-नास ॥ ४ ॥

---

## प्रवेश २ रा.

### स्थळः—मोदपूर, राजमहाल खानगी कचेरी.

राजा शूरमणी—प्रधानजी,

"प्रितीस पात्र," या चालीवर.

मज ईशकृपें सर्व सौख्य प्राप्त तें असे ॥ श्रेष्ठ मंत्रि ते तुह्मा समान फारसे ॥ ध्रु० ॥ नच राजशकट चालवावयाची काळजी ॥ परि पुत्र सुखावीण दुःख सर्वकाळ जी ॥ ईश्वर कधिं करिल परमदुःख दूरसें ॥ मज ईश कृपें० ॥ शोधहि नच दर्शिकापती कुठें असे ॥ असतें केलेंच पहा

लग्न रम्यसें ॥ दर्शिकेस पतिसह बघणेंचि मनिं वसे ॥ सांगा संतापहर उपाय कायसे ॥ मज ईशकृपें० ॥

प्रधान—महाराज,

॥ साकी ॥

माझें मन मज साक्ष देतसे पडुनि गांठ प्रेमाची ॥ होइल पूर्ण मनोरथ सत्यचि चिंता जाय मनाची ॥ पूजुन महाकाली ॥ प्रसादें कार्यभाग उकली ॥

( इतक्यांत दर्शिकेची सापत्न बहीण सीमंतिनी येते. )

सीमंतिनी—( शोकाकुल रडत )

॥ दिंडी ॥

"भैरवी सौख्य मानुनी," या चालीवर.

रक्षि रक्षी मम तात घात झाला ॥
राजा शूर०—काय झालें गे तुला सांग मजला ॥
सीमं०—बुडविली हे दर्शिका नदीस्नानीं ॥
राजा शूर०—कोणी ? कशी !

सीमं०—दुष्ट मातेनें नीच काम करुनी ॥ १ ॥
राजा शूर०—हा दुष्टे चांडाळणी !

"किती कपटि असती," या चालीवर.

किति दुष्ट कर्म त्वां केलें ॥ दाउनि अकपट प्रेम शेवटीं । मोहुनि मज फसविलें । गे ॥ कि०॥१॥ मीच मूर्ख विश्वासें वागुनि । प्रिय कन्ये नागविलें । गे॥ कि०॥२॥ अनृत–साहस–दुर्गुण–पूरित । स्त्रिया असति अनुभविलें । गे ॥ कि० ॥३॥ ऐशा स्त्रीचें मुखावलोकन । नरकतुल्य मज गमलें । गे ॥ कि० ॥ ४ ॥ ( रागानें पुढील चरण ह्म० ) दुष्टे थांब अतां फळ देतों । कधिं न पूर्वि देखियलें । गे ॥ कि० ॥ ५ ॥

( राणीला मारण्याकरितां आवेशानें जाऊं लागतो. इतक्यांत )

प्रधान—( राजास धरून ) महाराज शांत व्हा, शांत व्हा. इतकें क्रोधाधीन एकदम होऊं नये. पुढें सीमंतिनी काय सांगते तें ऐकून नंतर काय तो विचार होईल. ( सीमंतिनीस ) बाई आपणांस कसें माहित झालें कीं,

दुःशीलाबाई साहेबांनींच दर्शिकेस नदींत बुडविलें ह्मणून ?

सीमं०—सांगतें ऐका:—

"वीर–शिरोमणी सकल धनुर्धर," या चालीवर.

भगिनि दर्शिका नदींत बुडतां वीर पुरुष येउनी ॥ कथियला वृत्तांत मजलागुनी ॥ ध्रु०॥ "काल दुपारीं कालिमंदिरीं ऐकियलीं भाषणें ॥ सांगतों खास तुला अंगने ॥ सापत्न भाव प्रकटुनि पूर्णचि कन्येवरि ॥ राणिनें कथियलें पुजाऱ्यासि प्रीतीनें॥नवरत्नांचा हार तयातें देऊनि त्यासी म्हणे ॥ दर्शिका मारावी युक्तिनें ॥ चाल ॥ देईन बहुत धन अलंकार भूषणें ॥ ऐकुनी फितविलीं रामोशांचीं मनें ॥ धाडीन दर्शिका मी स्नाना कारणें ॥ बुडवावि तियेली नदीमधीं तत्क्षणें ॥ चाल ॥ पाणबुडे, पुजारि लुब्धुनी भावी द्रव्य भूषणीं॥ बुडविली तीस वेळ साधुनी" ॥ भगिनि० ॥

राजा शूर०—हर हर ! काय दुष्ट पहा ! ! बरें पुढें सांग ! ! !

सीमं०—आणखी त्यानें असें सांगितलें कीं:-

## सदर.

पूर्वदिनीं ऐकून भाषणें चुटपुट माझे मनीं ॥ लागुनी आलों दुसऱ्या दिनीं ॥ सरिता स्नाना तिथें पाहतां सर्व घाट साधुनी ॥ धेरिली दार्शिकाच खलजनीं ॥ बुडवितांचि तिस रामोशांतें धरूनि म्यां तत्क्षणीं ॥ बांधिलें वृक्षासी जखडुनी ॥ चाल ॥ शोधितों तिला जा सत्वर तूं येथुनी प्रार्थिगे नृपास सहाय खलनाशनीं ॥ तूं परत येई तों असे तिच्या शोधनीं ॥ नाढळतां देइन प्राण सरिज्जीवनीं ॥ चाल ॥ कथितां ऐसें विकल होउनी आल्यें दुःखितमनीं ॥ कीं दावा दार्शिकेस ह्या क्षणीं ॥ भगिनि० ॥

हा ! भगिनी ! आतां तूं मला कसची भेटतेस ! ! ( मूर्छित पडते. )

शूर०—( तीस सांवरून ) बाळे सीमंतिनी ! रडून काय करतेस ! ( प्रधानास ) आपण पुढें होऊन त्या दु-

ष्टांस कैद करावें आणि प्रिय दर्शिकेच्या शोधास लागावें. मी मागून आलोंच.

**प्रधान**—जशी आज्ञा. ( जातो. )

**शूर०**—पहा ह्या रांडेनें कसें अघोर कृत्य केलें तें ! आतांच तिला योग्य शासन दिलें असतें. पण दर्शिका बुडून फार वेळ झाला नाहीं ह्मणून तिचा लवकर थाङ्ग लागला तर ती उठण्याचा संभव आहे. तर अगोदर तिकडे जावें. ( सीमंतिनीस ) बाळे, चल मजबरोबर गंगेवर.

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थळः—मोदपूर, बाणगंगेचा कांठ.

---

**प्रेमाच्या बापाचा प्रधान सुमती**—( आपल्याशीं गहिंवरून ) आज बारा वर्षें झालीं ! प्रिय प्रेमाच्या शोधाकरितां हा जोगीवेष धारण करून निघालों ! वनें उपवनें शोधिलीं ! गिरी गुहा पाहिल्या ! शहरोंशहरीं फि-

रलों! परंतु कोठेंही त्याचा शोध नाहीं! केवढा मी दु-र्भागी! ज्याप्रमाणें भरताची रामाच्या ठिकाणीं आसक्ति, त्याप्रमाणें किंबहुना त्यापेक्षां कांकणभर जास्त माझी माझ्या राजपुत्राच्या ठिकाणीं असतां अद्याप त्याचा पत्ता लागून माझा मनोरथ पूर्ण होऊं नयेना! एकदां तरी तो माझ्या दृष्टीस पडावा ह्मणून मीं नाना तीर्थें केलीं! हवे तेवढे नवस केले! व्रतें, उपवास केले! पण कांहीं उपयोग झाला नाहीं! काय माझें प्रारब्ध! असो, त्रिकालज्ञ तपस्व्यांत अग्रमणी असे जे उग्रदर्शन महामुनी, त्यांची सेवा आज कित्येक दिवस मी करीत आलों ह्मणून आज त्यांनीं संतोषित होऊन सांगितलें कीं, ह्या बाणगंगेच्या कांठीं पूर्व दिशेला मोदपुरी शहर आहे. तेथें देवीच्या घाटावर प्रेमाची गांठ पडेल. असें सांगतांच त्यांची आज्ञा घेऊन येथें आलों. पण येथें कोठेंच कांहीं दिसत नाहीं.! मात्र त्या समोरच्या झाडाशीं दोन माणसें जखडून बांधलेलीं दिसतात; दुसरें कांहीं नाहीं! (जरासा पुढें होऊन) अरे हें काय! येथें ही तरवार कोणाची? (उचलून घेतो आणि निरखून पाहून) अरे, हें पहा हिच्यावर कांहीं लिहिलेलें दिसतें आहे! (वाचून) ही

तरवार विक्रमाची! मग खात्रीनें सांगतों प्रेमसिंह येथें कोठें तरी असला पाहिजे ! असो, आतां माध्यान्हकर्में राहिलीं आहेत तीं उरकून घेण्यास धीर आला. आतां उशीर न करितां कर्में सारून मग प्रेमाच्या शोधास लागावें ( असें ह्मणून नदींत खोल पाण्यांत स्नानाकरितां बुडी मारतो, इतक्यांत प्रेमाचें आणि दर्शिकेचें अशीं दोन प्रेतें सांपडतात तें पाहून ) हायरे क्रूरकर्मा दैवा !

"रामसखा वनिं जाईं," या चालीवर.

**काय गती प्रेमाची, अहाहा काय गती प्रेमाची ॥ मूर्छित होउनि पडला साची ॥ ध्रु० ॥ ऐशा स्थिति मधिं गांठ पडावी । काय अतांही तनु ठेवावी ॥ झाली निराशा मनिंची, वाट धरावी परलोकाची ॥ काय गती० ॥**

( विचार करून ) नाहीं नाहीं, असें करूं नये ! तर?

**परि जेणें मज भेट करविली । निश्चयरूपी खुण सांगितली ॥ घेइन भेट तयाची । ठेविन मग मी देह तिथेंची ॥ काय गती प्रेमाची० ॥**

(दुसऱ्या प्रेताकडे पाहून) बरें! हें दुसरें कलेवर कोणाचें असावें बरें? ह्या स्त्रीच्या प्रेतास पाहून तर कल्पनाच चालत नाहीं! हिचा आणि प्रेमाचा तर कांहीं संबंध नसेलना! असो कांहीं कां असेना! पण येवढें खचीत कीं, ज्या स्थितींत प्रेम मूर्छित झाला तीच स्थिति हिला प्राप्त झाली असावी. ह्मणून हिला पण बरोबर न्यावें. गुरुकृपेनें उठलीं तर दोघांचीं प्रेतें उठतील! (तिचें रूप पाहून) ह्या स्त्रीचें रूप पाहतां ही कोणा तरी कुलिनाची कन्या असावी! ही वेळेवर घरीं गेली नाहीं ह्मणून हिचीं मातापितरें शोध करतां करतां येथें येतील; यांत संशय नाहीं. याकरितां हिला प्रेतरूपांत अमक्या ठिकाणीं नेली आहे, तेथें आपण आलांत तर दैवयोगानें भेट होईल. नाहींतर निदान वृत्तांत समजून प्रेत तरी मिळेल! असें पत्र लिहून टाकावें आणि मग जावें. असें केलें ह्मणजे बिचारीचे आईबापांस कांहींसें समाधान वाटेल! (तसें करून नावेंत प्रेतें घेऊन नाव हांकारून जातो.)

(इतक्यांत शूरमणीचा प्रधान कालीच्या पुजाऱ्यास चतुर्भुज करून नदीकांठीं बांधलेल्या रामोशांजवळ येतो आणि त्यांच्यापासून सर्व

हकीकत मिळवितो.आणि कांहीं
पाणकुडे नदी शोधण्या-
स पाठवितो. )

**प्रधान**—( पुजाऱ्यास )

॥ साकी ॥

अधम कर्म करणाऱ्या विप्रा धिक्कार असो तुज-
ला ॥ खाशी तेथील वासे गणशी किमपि न
लाज मनाला ॥ कैसी मति चळली । दुष्टा दुष्कृ-
ति आचरली ॥

( मारतो )

" भैरवी ताल पंजाबी. "

**पुजारी**—मारूं नकाहो मजला ॥ अनुचितकर्म
मीं केलें त्याचा॥ होतो खेद मनाला॥
इतुकें मारूं नका हो मजला ॥१॥ रक्त
निघालें हालचि झाले । शरण मि
जाउं कुणाला ॥ इतुकें मारूं नका
हो मजला ॥

( इतक्यांत राजा सीमंतिनीसह येतो )

**प्रधान**—( नमन करून ) महाराज, हे अपराधी हजर आहेत.

**शूरमणी**—पण दर्शिकेचा शोध केलात काय आधीं पाण्यांत ?

**प्रधान**—महाराज ! खालीचे पाणबुडे नदी तपासताहेत.

**शू०**—कायरे ब्राह्मणाधमा ! हें तूं काय कर्म केलेंस ? चोरा ! ( मारतो )

**पु०**—महाराज मारूं नका! सांगतों सगळं. दुःशीलाराणीसरकारानें मला फशीं पाडलें !

**शूर०**—तूं अज्ञान होतास ?

**पु०**—नाहीं महाराज ! पण त्यांनीं हें काम सांगण्यापूर्वी भंडारा उचलविला, ह्मणून फसलों !

**पाणबुडे**—( निराशेनें ) महाराज, आह्मीं सर्व नदी पालथी घातली, पण कुठें कांहीं सांपडलें नाहीं ! फक्त घाटावर एक पत्र सांपडलें आहे. तें, हें घ्या.

**शूरम०**—(पत्र वाचून) प्रधानजी कोणी एकानें एका स्त्रीचें आणि प्रेमाचें अशीं दोन प्रेत उग्रदर्शन मुनीच्या आश्रमीं नेलीं आहेत्. त्यानें आपणांस तेथें बोलाविलें आहे ! प्रधानजी

मला वाटतें, स्त्रीचें जें प्रेत तें बहुतकरून दर्शिकेचें असलें, पाहिजे ! आणि प्रेमाचें प्रेत ह्मणून जें लिहिलें आहे , तो प्रेम कोणचा बरं ? जांवई तर नसेलना ? ( विचार करून ) होय तोच असला पाहिजे ! ( गहिंवरून ) हायरे दैवा ! बाळा प्रेमा ! तुमची शेवटीं हीच अवस्था ऐकण्याचें माझे नशिबीं आलेंना ? असो प्रधानजी, आतां माझ्याच्यानें येथें क्षणभर देखील उभें रहावत नाहीं. ह्मणून मी सांगतों तशी ह्या सर्वांची व्यवस्था करून मग ऋषिआश्रमीं या.

॥ पद ॥

"कल्याण, धुमाळी तस्करा हातीं," या चालीवर.

दुष्ट चांडाळी । अति कपटी दुःशीला ॥ दर्शिका नाश हेतु धरिला ॥ तिला ठेवावें । किल्ल्यामधिं बंदीला ॥ असे जो निर्जन विपिनाला ॥ पुजारी तोही । होऊनि साह्य सजला ॥ न केला सदुपदेश तिजला ॥ अशा नीचातें । देहांत दंड ठरला ॥ परि द्विज वंद्य क्षत्रियाला ॥ कापुनी जिव्हा । न्या काळे पाण्याला ॥ बुडवि जो रामोशी त्याला ॥ फांशिला द्यावें । परि अन्य बेर-

डाला ॥ किं द्यावी सक्त कैद त्याला ॥

प्रधान—( हात जोडून ) जशी आज्ञा.

---

## प्रवेश ४ था.

स्थळः—उग्रमुनींच्या आश्रमाजवळील भाग व आश्रम.

---

॥ कटाव ॥

सुमती—

उग्रमुनी दर्शन घेतां, संकट निज विलया पावे, त्या ठायीं जावें ॥ ध्रु० ॥ वृक्ष घनवटी वेष्टित आश्रम दिसेच पुढती, मेघाच्छादित रविनें जणुं प्राग्दिशा शोभती; तया सभोंतीं चित्रविचित्रचि रंगी बेरंगी पुष्पांनीं फुललेलीं फुलझाडें दिसती; ताल तितल हितालहिं तैसे उंच वृक्ष गगनासि चुंबिती; लोध्र लवलि आणि लवंग तरुचे मंदवायुनें पल्लव डुलती; आम्रतरूंवरि

सुंदर मोहर असुनी त्यांवर सुगंध परिमळ लंप-
ट ऐसे भ्रमर पहा गुंजारव करिती; कोकिल
मैना उंच मधुर पंचम स्वरानें ध्वनी काढिती;
सकल वृक्ष ते पुष्पवृष्टि पृथ्वीवरि करिती; अ-
धर्म नाशाचि जणुं सूचविती; तसेच तिकडे हरि-
ण पहा ते कळप करुनिया निर्भयचित्तिं यथेच्छ
रमती; वाहवा वाहवा पहा अहाहा ऋषिकुमार
सुकुमार किती हा व्याघ्र कर्ण निजकरीं ओढु-
नी दावितसे धैर्याची स्फूर्ती दिसतो जणुं मद-
नाची मूर्ती; अहो पहा इकडे ह्या स्थानीं होम-
धूम-कल्लोळ-मलिनता दिसे ईक्षणीं परि नाच-
रणीं शुक चंचूवरि मात्र दिसतसे राग परि न
तो विषय सेवनीं चंचलता कदलीच्या पर्णीं दि-
से मात्र परि नांतःकरणीं पक्षपातही विहगोड्डा-
नीं दिसे परि न तो कधीं स्वपर जनिं वसुलो-
भचि तो स्वर्ग वर्णनीं नोदरभरणीं रामासक्ति
दिसे रामायणि परि न स्त्रीजनिं; अशा मनोहर
सुंदर आश्रमिं तत्समीप बहु प्रचंड ऐशा वृक्षा-
खालीं गुरुमूर्ति पहा जाउन बसली; उग्रदर्शनहि

नाम जयाचें पुंज पहा दिसती तेजाचे; ऋषिमंडळ भवनीं तें ज्याचे दिसे जणूं सप्तार्णववेष्टित कुवलय साचें; कुलाचलीं मेरु कीं भासे तसा तयाचा देह जरेनें शुभ्र दिसतसे; तसे केशही शुभ्र असुनि तज्जटा दिसति शिरिं; सर्व ऋषींतें जिंकुनि जणुं त्या धर्मपताका उभारिल्या वरि किंवा स्वर्गावरि जाण्यास्तव पुण्य रज्जु कीं धरिल्या स्वशिरीं; अशा प्रकारें महामुनी गुरु क्षमाशील बहु क्षमाचि जैशी गंभिरता ती सिंधूसरसी कांति जणूं कीं तजोराशी शांतीनें ही वसिष्ठ ऋषि इंद्रिय—निग्रहिं जणूं तुळावा शांतनवासी; देह भस्मसित पहातां भासे शिव कैलासीं; यद्दर्शन हरितें तापांसी भीति न काळाच्या बापासी ठावत्रि कैंचा त्या पापांसी मूर्ति ऐसी विलोकुनी वंदिन चरणांसी इच्छित फळ साधावें त्या ठायीं जावें; उग्रमुनी दर्शन घेतां संकट निज विलया पावे. ॥ १ ॥

अहाहा! अशा महामुनीच्या दर्शनानें माझें प्रिय बाळ खरोखर उठेल. तर आतां विलंब न करतां त्यांच्या से-

वेला जावें. ( असें ह्मणून दोन्ही प्रेतें नावेंतून उतरून जवळच औदुंबर वृक्षाखालीं ठेवून दर्शनास जातो. ) भो भगवन् हा दास चरणीं लीन होत आहे.

उग्र०—कल्याण, यावें, कसें काय? वृत्ति उदासशी दिसते?

सु०—भगवन्, आपण सर्वज्ञ आहां. म्यां पामरानें काय सांगावें!

उग्र०—( विचार करून ) हं समजलों. बरें कांहीं हरकत नाहीं. त्याला अपमृत्यु होता, त्यामुळें असा प्रकार झाला. ( शिष्याकडे तोंड करून ) शंकरास रुद्राभिषेक करून तें तीर्थ ह्या सुमती प्रधानापाशीं द्यावें, ह्मणजे ते त्या शवावर सिंचन करण्यास जातील. ( सुमतीस ) सुमती ऐकिलें ना? हा आमचा मध्व आपणांस जें तीर्थ देईल तें घेऊन लवकर प्रेमाच्या प्रेतावर सिंचन करण्यास जावें.

सु०—थोरांच्या विभूती परोपकारार्थच परमेश्वरानें निर्माण केल्या आहेत, यांत संशय नाहीं! पण भगवन्

प्रेमाचें प्रेत म्यां येथेंच आणून त्या औदुंबराखालीं ठेविलें आहे; म्हणून मला तिकडे जाण्याचें प्रयोजन उरलें नाहीं.

उग्र०—शाबास, चांगलें केलेंत! चला तर आपण तेथें जाऊं. मध्वमुनी तिकडेच तीर्थ घेऊन येईल. ( शिष्यास ) मध्व, अभिषेक झाल्यावर लवकरच त्या औदुंबराकडे तीर्थ घेऊन यावें, आह्मी तेथें आहोंत.

मध्व—जशी आज्ञा.

सु०—पण महाराज, प्रेमाच्या शवाबरोबर एका स्त्रीचें शव आणिलें आहे. कारण प्रेम ज्या स्थितींत मृत्यु पावला त्याच स्थितींत ती स्त्री मेली असावी; शिवाय ती कोणत्या तरी उत्तम कुळांतील कन्या असावी, असें वाटतें. कसेंही असो, प्रेमाप्रमाणें तिजवरही अमृतदृष्टि केली पाहिजे.

उग्र०—फार उत्तम आहे. चला तर. ( जातात. )

( पूजेचा देखावा. पूजा संपल्यावर तीर्थ घेऊन मध्व निघतो. नंतर उग्रमुनी आणि सुमती प्रवेश करतात. )

सुम० भगवन्! हाच तो वृक्ष आणि हींच तीं शवें.

उग्र०—( पाहून ) अरेरे! यांचीं पोटें पाण्यानें फार भरलीं आहेत. करितां ही औषधि उभयतां प्रेतांच्या पोटांवर चोळा ह्मणजे मध्व येईपर्यंत पोटांतील पाण्याचें शोषण होईल. ( भुकटी देतो )

सु०—( चोळतो. इतक्यांत मध्व येतो )

मध्व०—भगवन्, हें तीर्थ.

उ०—सुमती हें तीर्थ घेऊन प्रेतांवर तीन वेळ शिंपडावें. आम्ही त्या वृक्षछायेंत बसतों.

सु०—जशी आज्ञा.

( उग्रमुनी आणि मध्व वृक्षाखालीं जाऊन बसतात.
सुमती तीर्थ शिंपडतो, प्रेतें उठून एकमेकांकडे पाहून ओळखल्यासारखें करून
विस्मय पावल्यातात. )

दर्शिका—अग बाई, हा काय चमत्कार!

**लावणी**. चाल उदकीं क्रीडती.

**कशि चमत्कृति, नेत्रिं दीसते; मज न भान, दि-**

से रान, खचित जाण, होय स्वप्न, कशि आ-
ल्यें इथें ॥ (प्रेमास पाहून) बघुनि ह्या नरा,
हृदय ऊलतें; प्रेम दाट, मनिं अचाट, सुवक घाट,
बहुत थाट, बघुनि वाटतें ॥ प्रेम मम पती, हेंचि
खास ते; पुशिन यांस, बहुत त्रास, मन्मनास,
निश्चयास, करिन साध्य तें (प्रेमास विनवून)
कोण हो तुह्मी, नमुनि विनवित्यें; उपवनांत,
चलितस्वांत, करुनि शांत, प्रेमकांत तुह्मिच भास-
तें ॥ कोणहो तुह्मी ॥

प्रेम—होयगे सखे, तोचि मी तुतें; देउन धीर,
मन अधीर, करुनि स्थीर, प्रेमवीर, ह्म-
णति आमुतें ॥ होयगे० ॥

(मीच प्रेम ह्मणतांच दर्शिका आणि सुमती दोघेंही कड-
कडून भेटतात. नंतर प्रेम दर्शिकेस ह्मणतो) प्रिये, तुझी
भेट अशा चमत्कृतीनें झाल्यामुळें मनाला फार आश्चर्य
आणि आनंद वाटतो आहे! पण प्रिये, दुसऱ्यावर अनुग्र-
ह करून आपणास धन्य ह्मणविणारे हे सत्पुरुष कोण?

दर्शि०—जिवलगा, मी पण आपणाप्रमाणेंच या वि-

षयीं अनभ्यस्त आहे. करितां आपणच त्यांना विचारावें.

**प्रेम**--महाराज, आपण सर्वसंगपरित्याग करून देहाचें सार्थक केलेंत. व आपल्या दर्शनेंकरून आह्मी कृतार्थ झालों. परंतु आह्मांकडून अशी कोणती सेवा घडली कीं जेणेंकरून आह्मासारख्या संसारी प्राण्यांवर पूर्ण अनुग्रह करण्याचें आपल्या मनांत आलें? तर महाराज आपल्या देहास काय संज्ञा आहे, आणि मी व माझी प्रियसखी येथें कसे आलों, हें सर्व आह्मांस ऐकण्याची उत्कट इच्छा आहे, ती पुरविणें आपल्याकडे आहे.

**सु०**--महाराज, मी जोगी नसून आपला बंदा गुलाम आहें. आपल्या वडिलाचा मी प्रधान! मला सुमती ह्मणतात. आपलें वैभव नष्ट झालें, त्या दुःखद स्थितींतच आपलाही वियोग आह्मास घडला! असें होतांच त्या वेळेस मी हा वेष धारण करून आपल्या शोधार्थ निघालों. पुढें बारा वर्षांनीं जेव्हां भाग्योदय झाला, तेव्हां आपण मोदनगरींत ह्या बाणगंगेच्या डोहांत आपल्या ह्या प्रियेसह प्रेतरूपानें भेटलांत!

**प्रेम**--खरोखर आमची तशी अवस्था झाली होती खरी ! कशी ह्मणाल तर ह्या प्रिय सखीच्या सापत्न मातेनें कालीच्या पुजाऱ्याच्या साहाय्यानें पाणबुड्यांकडून हिला नदींत बुडविलें ! दर्शिकेस बुडविणार असा मीं स्वतः काल कालीच्या मंदिरांत पाणबुडे आणि पुजारी ह्यांचा एकांतांत होत असलेला विचार ऐकिला होता. तो त्यांचा विचार सफळ होऊं नये ह्मणून आज मी गंगेवर गेलों. पण क्षणमात्र मला पोंचण्यास उशीर झाल्यामुळें त्या दुष्टांनीं प्रिया स्नानास गंगेंत उतरतांच तिला बुडविलें ! असें धोरण समजतांच त्या दुष्टास मीं झाडाशीं गच्च जखडून टाकिलें. आणि हिची सापत्न बहीण सीमंतिनी इच्याबरोबर आली होती, तीस सर्व वृत्तांत सांगून राजास कळविण्यासाठीं पाठविलें. नंतर लगेच मी हिच्या शोधार्थ गंगेच्या डोहांत पडलों. पण दुर्दैवानें मी पण हिचीच अवस्था पावलों ! असो, आपण निस्सीम राजभक्त ह्मणून इतके श्रम घेऊन आह्मांस पुन्हां जीवंत केलें. आपले उपकार कशा रीतीनें फेडावेत !

**द०**--(ऐकून) हर ! हर ! ! मीं दुःशीला आईचे असे कोणते बरं अपराध केले होते !

सु०—महाराज, मीं कांहींएक केलें नाहीं. आपण दैवशाली ह्मणून ( मुनीकडे बोट दाखवून ) त्या महातपस्व्यांच्या उदार कृपेनें मी आज आपले चरण पाहत आहें!

प्रेम०—अस्सें काय! चला तर त्यांस अभिवंदन करण्यास जाऊं. प्रिये चला. ( मुनीकडे जाऊन ) ( तिघे साष्टांग नमस्कार करतात आणि )

॥ पद ॥

"दादरा. राग जंगला." गरबीच्या चालीवर

पहा किती वदूं मुखीं आभार तुमचे ॥ कृपा करूनि वांचाविले प्राण आमुचे ॥ ध्रु० ॥ महा समर्थसे तुह्मी प्रभूजि भेटलां ॥ परोपकारिं देह सतत सर्व झिजविला ॥ तुह्मा समान या जगीं आह्मां न दीसला ॥ धन्य धन्य जन्म सफल आज आमुचें ॥ पहा० ॥

उग्र०—हे महाबाहो सुमती, बाळा प्रेमसिंहा, बाळे दार्शिके, माझी कांहीं इतकी स्तुति करण्याचें प्रयोजन नाहीं! असो, तुह्मी सर्वजण अष्टैश्वर्यानें नांदाल यांत सं-

शय नाहीं. (इतक्यांत पडद्यांत गलबला होतो. तें ऐकून) मध्वा, पहा बरं काय आहे बाहेर तें!

मध्व—(बाहेर जाऊन येऊन) भगवन्, राजाधिराज शूरमणी प्रधानासमवेत येत आहे.

उ०—बरें आहे, त्यांचा योग्य सत्कार राहील असा बंदोबस्त ठेव.

(शूरमणी व प्रधान येऊन त्यांस प्रणाम करितात.)

उग्र०—कल्याण राजा, यावें बसावें. प्रधानजी आपणही बसावें.

(इतक्यांत राजाची दृष्टि आणि दर्शिकेची दृष्टि एकमेकांवर पडते. नंतर उभयतां भेटतात.)

दर्शिका—बाबा, मला व माझ्या प्रियकरास पुनर्जन्म, (सुमतीकडे पाहून) ह्या महाबाहु सुमती–प्रधानानें मोठे श्रम घेऊन (मुनीकडे) या भगवंताच्या कृपेनें दिलें. ह्मणूनच मी आपणांस सानंद भेटल्यें!

शूर०—(सुमतीस) काय? आपणच सुमती का?

अहाहा, आज केवढा आनंदाचा दिवस! सुमती, आपणास या वेषामुळें ओळखिलें नाहीं; याबद्दल क्षमा असावी.

सु---हें काय! मीच आपणापाशीं क्षमा मागतों. कांकीं, आपण आमच्या धन्याचे व्याही किंवा बाळ प्रेमसिंहाचे श्वशूर असतां मीं आपणास ओळखिलें नाहीं!

शूर०---( ऐकून आश्चर्यानें ) काय! प्रेमसिंह हेच का? ( प्रेमास भेटून ) आज मी खरोखर धन्य आहें! मला वाटत नव्हतें कीं, तूर्तच ईश्वर असा योग घडवून आणील! असो, ( दर्शिकेस ) बाळे, आतां तूं सुखी होशील बरें.

द०---वडिलांचा आशीर्वाद मिथ्या होणंच नाहीं.

शूर०---( उग्रमुनीस ) भगवन्, आपण ह्या दासावर महत् उपकार केलेत! ह्मणून मी अनन्यभावें शरण आहें.

उग्र०---राजा, अरे ह्यांत उपकार कसले? आमचा धर्मच आहे. तुह्मासारख्यांना सौख्य व्हावें ह्मणून तपश्चर्या करावी. आणि तुह्मीं आमचें दुष्टांपासून रक्षण करावें. असो, आतां अगदीं अस्तमान झाला असून गोरज संधि

आहे, यासाठीं ह्या मुहूर्तावर यांचा तूर्त गांधर्व विवाह करावा, आणि मग विश्रांतीसाठीं आश्रमांत चलावें.

शूर०—जशी आज्ञा. ( प्रेमास ) अहो प्रेमसिंह,

॥ **साकी** ॥

**प्रेमा प्रेमभरें स्वीकारी प्रेमें तुज ही दिधली ॥**

**प्रेम०**—( अंगीकारून ) **अंगिकारिली आनंदानें, बहु मम हृदयीं ठसली ॥**

**सुम०—नांदा सौख्यभरें ।**

उग्र०—पुरतिल तुमचे हेतु बरें ॥ १ ॥

शूर०—चला आतां. ( जातात )

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळः—मोदपुरी राजमहाल. दर्शिकेचें शयन-मंदीर.**

---

दर्शिका—लवंगिके, प्राणनाथास मोगऱ्याच्या फुलांची

फार आवड आहे, करितां कमालखानी हार उत्तम प्रकार-
चा करून ठेव बरें.

लवं०——जशी आज्ञा.

( इतक्यांत प्रेम येऊन तिला पाहून
एकीकडे आपणाशीं ह्मणतो. )

प्रेम——( तिच्या नजरे आड उभें राहून ) अहाहा !

॥ पद ॥

"हे मना सोड कल्पना," या चालीवर.

ईश्वरें, रत्न बहु बरें, दिलें मज खरें भाग्य मम
मोठें ॥ किति वर्णुं सुंदरी बघुनि हर्ष मनिं दाटे॥
ध्रु०॥ मोहिनी, अब्धिमंथनीं, अमृतवितरणीं, ती-
चे अवतरली । जणुं इंद्रनील रत्नांची बोलकी
पुतळी ॥ नेसुनी, शालु बैंगणी, पदर सारुनी, व-
रून पांघरली । अति लाल गुलाली शेला चम-
कली विजली ॥ लखलखी, भूषणीं निकी, तेज
मंचकीं, पडुन मनिं गमली । जणुं चंद्रबिंब किर-

णांनीं रजनी खुलली॥केशरी, कीं भाळी धरी, ति-
लक सुंदरी, तत्प्रभा दिसली । जणुं तृतियनेत्रभा
धूर्जटिची अनुसरली ॥ चाल ॥ शंभु प्रिय भिल्लि-
ण वेष; हा खरा । स्वरूपाशीं तुळितां भासे; इं-
दिरा । कीं रतिच मदनाची विलसे; सुंदरा । भों-
वया कसुनि धनु मारी; जणुं शरा ॥ कचघनांत
चमके चपला; जणुं हिरा ॥ चाल ॥ पहिली॥
मुसमुसें, तरुणपण कसें, शरीरीं दिसे, बघुनि म-
ज वाटे । कवळावि सुंदरी धरुनि हृदयीं करपु-
टें ॥ १ ॥ ॥ ईश्वरें० ॥

अशा सुंदरीस सोडून परदेशीं जाण्याचें आलेंना ? अ-
सो, आतां पुढें होऊन प्रियेला आलिंगन द्यावें. आणि नं-
तर तिजपाशीं जाण्यास आज्ञा मागावी. ( असें ह्मणून ति-
ला आलिंगन देण्यास पुढें होतो. इतक्यांत त्यास पाहून,)

दर्शिका--( पलंगावरून त्यास सामोरी जाऊन )
प्राणनाथ, या समयीं--

॥ साकी ॥

भवदागमनें दासीवर या थोर अनुग्रह झाला ॥

पूर्ण कृपा मजवरी आपुली करण्या कार्या आलां ॥ आज्ञा मज व्हावी ॥ सेवा घ्यावी मजकरवीं ॥ १ ॥

प्रेम—( तिला आलिंगून )—

॥ साकी ॥

प्रेमालिंगन तुज दिधल्याविण, अन्य कार्य मज न सुचे ॥ ह्मणुनिच मध्यंतरीं भेटाया, आलों कोठें न रुचे ॥ कांते बघुनि तुला । होतो आनंद चित्ताला ॥ १ ॥

दर्शि०—

( " अंगिकार करुनि तुझा गर्व " या चालीवर. )

क्षणभरी वियोग मज न सहन होतसे ॥ अशी कृपा सदैव व्हावी वीनवीतसे ॥ ध्रु० ॥ क्षण० परि उदास चित्त मजसी आपुलें दिसे ॥ किन्निमित्त जाणवा अधीं मला कसें ॥ मुखेन्दु तेजदीसतेंच कांतिहीनसें ॥ त्वरा करुनि जाणवाचि जें मनीं वसे ॥ क्षण० ॥

प्रेम---प्रिये, एक---

पूर्ण धूर्ततेची मूर्त मजसि तूं दिसे ॥ भूप हस्तिनापूरास पाठवीतसे ॥ अद्भुत दरबार तिथें थोर भरतसे ॥ परी तुझा वियोग मनिं असह्य गमतसे ॥ कसें करूं सखे तुझा वियोग होतसे ॥ क्षणभरी० ॥

दर्शि०---प्राणनाथ काय चिंता आहे ! पहा---

॥ भैरवी ॥

नाथा किमपि न चिंता करणें ॥ तुह्मांबरोबर येइन सखया । आनंदें मज नेणें ॥ नाथा० ॥ध्रु०॥

प्रेम---

तुज नेण्याचा समय नसे हा, ह्मणूनि रजा मज देणें ॥ कांते किमपि न चिंता करणें ॥

दर्शि०---प्राणनाथ, मी आपल्या मर्जीबाहेर नाहीं. पण माझा नियम आपणास माहीत नाहीं काय ?

प्रेम---प्रिये, कोणता नियम सांग पाहूं !

दर्शि०—महाराज—

" झाली ज्याची उपवर दुहिता " या चालीवर

दर्शन आपुलें झाल्यावांचुनी अन्नग्रहण न कर-
णें मजला ॥ ध्रु० ॥ नेम असा हा जाणुनि आ-
पण जातां परि निरसा चिंतेला ॥ १ ॥ दर्श०॥

प्रेम— सदर.

येई तोंवरि देवदर्शनचि, घेउन अन्नग्रहण क-
रावें ॥ ध्रु० ॥ शिवाय माझी प्रतिमा तुजला
देतों पाहुनि तुष्ट असावें ॥ १ ॥ येई० ॥

दर्शिका—जशी सरकारची आज्ञा.

प्रेम—येतों तर. पण एकदां.

दर्शिका—( लाजून खालीं पहाते. )

प्रेम०—( तिचें चुंबन घेऊन ) प्रिये येतों बरें. संभाळून रहा. ( असें ह्मणून जातो. )

दर्शि०—( दासीस ) लवंगिके, पुजेची तयारी कर. कारण पतीस प्रवास सुखकारक व्हावा म्हणून देवतार्चन करणें आहे, चल तर.

## प्रवेश २ रा.

### स्थळः—मोदपुरी राजवाड्यांतील रस्ता.

**कामंदकी**—आजच मी रजेवरून येऊन नोकरीवर हजर झालें! येथें येऊन पाहतें तों सर्वच कारभार बदललेला दिसला! दुःशीलाबाईसाहेबांची स्वारी किल्ल्यांत जाऊन अडकली! आणि तसें झालें तें कांहीं वावगें झालें नाहीं! कारण त्यांची कृति तशीच शहारे उत्पन्न करणारी होती! असो, आपल्याला दुसऱ्याचें काय करावयाचें आहे! करील तो भरील. ( सुस्कारा टाकून ) आज मीं दर्शिकेच्या नवऱ्यास स्नान करतांना पाहिलें! धन्य भाग्य त्या दर्शिकेचें! त्याला पाहिल्यापासून कसेंसेंच मला झालें आहे! काय त्याचें रूप आणि तेज! त्याला पाहिलें त्यावेळीं; शंकरानें मदनास दग्ध केल्यावर त्या मदनानें हा मानववेष धारण केला आहे कीं काय नकळे, असें मला वाटलें! त्याचें शरीर ज्योतिर्मय भासलें! त्यानें स्नान केल्यावर जो त्रिपुंड्र लाविला होता तो पुण्याचा किंवा शौर्याचा ध्वजच काय? असा दिसला! त्याचें कपालभाल केवढें विस्तीर्ण! त्याच्या भोंवया क-

मानदार, नेत्र हरिणासारखे, नासिका सरळ, हृदयांत प्रविष्ट न झालेला असा तारुण्याचा अनुरागच काय ? असा आरक्तवर्ण त्याच्या ओंठावर होता ! मुख भ्रमररहित कमलाप्रमाणें प्रफुल्लित होतें ! असा तो मनोहर पुतळा प्रेम माझ्या दृष्टीस पडतांच, मकरंद जसा भ्रमरीस पराधीन करतो, त्याप्रमाणें मला मदनानें पराधीन केलें ! त्यावेळीं शिकल्यावांचून शिकलेल्या, सांगतां न येणाऱ्या विकारांनीं माझें चित्त गुंग झालें ! फार तर काय, पण श्वासोच्छ्वास सोडण्यासही मी विसरलें ! नंतर कांहीं वेळानें सावध होऊन पहातें तों ती मदनमूर्ति तेथून निघून गेली ! पण ती कोठें गेली हें समजेना म्हणून तीस शोधण्याकरितां मी केव्हांची फिरत्यें ! पण अद्याप सांपडत नाहीं ! ( विचार करून ) मला वाटतें आतां भाग्यशाली दर्शिकेचें मंदीर पहावें. तेथें ती सुंदर मदनमूर्ति खास भेटेल ! ( असें म्हणून दर्शिकेच्या महालाकडे जाण्यास निघते, तोंच मार्गांत प्रेम तिला दिसतो ) अरे वः स्वारी तर इकडेच येत आहे ! तर मग आपणच पुढें होऊन त्यांस भेटावें ! ( पुढें जाते, व प्रेमाची तिची गांठ पडतांच प्रेमाच्या पायां पडून म्हणते. )

## ॥ पद ॥

" हं मदंगा हात लावु नका " या चालीवर.

प्रेमविरा, मज द्याचि धिरा, तुह्मि अवनकरा, मज अभय करा ॥ तीव्रशरें तनु होय चुरा, मज तारक हो नच तो दुसरा ॥ ध्रु० ॥

प्रेम—

कोण कशास्तव आलिस येथें । कोण तुला छळितो कुतरा । मज सांग जरा । करितोंच चुरा॥ कशास धरिते भीतिभरा । स्मर गौरिवरा । धरि धैर्य जरा ॥

कामं०—

भ्रांतचि झाल्यें तुह्मा बघुनिया । मन्मथखळ करितो निकरा । धरुनीच करा । मज शांत करा॥ तीव्र शरें तनु होय चुरा । मज तारक हो नच तो दुसरा ॥

प्रेम—

दुष्ट कुटिल पापिष्ट असससिगे । जाइ घरा करिशी नखरा । धरि लाज जरा । कुविचार खरा ॥

काय स्त्रियांची जात दुष्ट असते पहा ! । घरिं सुंदर होय जरी नवरा । परक्या पुरुषीं करिती नजरा ॥

कामं०—

शरणागतासि मरण चिंतणें । योग्य नसे कुलशील नरा । सुविचार करा मज द्या पदरां ॥ तीव्रशरें तनु होय चुरा । मज तारक हो नच तो दुसरा ॥

प्रेम—

दुष्टे नष्टे अंध नेत्र तव । वाक्य तुझें मज जाळि उरा । चल जाइं घरा, बघ करिन चुरा ॥ धिक्कार असो तुला जरा नच वागविशीं मनिं पापदरा ॥

दुष्टे चल जा येथून, आपलें काळें कर.

कामं०—( रागानें ).

॥ पद ॥

" उद्यां बघ जातें " या चालीवर.

निराश मी झाल्यें, खळ नादीं लागुनि फसल्यें ॥ ध्रु० ॥ दुष्टा घातकिया चांडाळा, नीचा षंढा न दया तुजला ॥ द्रवही येता पाषाणाला,

इतुकें नमिलें ॥ खळ० ॥ जिच्या जिवावर तूं उडतोसी, तीच्या हस्तें वधविन तुजसी ॥ तरिच खरें कामंदकि मजसी । नामचि सजलें ॥ खळ० मूढा नच ओळखिलें मजसी । राणी दुःशीलेचि मी दासी ॥ तुजसम किति लागुन झुरणीसी । धुळिस मिळाले ॥ खळ० ॥

प्रेम—दुष्ट, चालती हो येथून, नाहीं तर बघ. ( मारण्याचा आवेश आणतो )

का०–( पुटपुटत जाते )

प्रेम—

" व्यर्थ मी जन्मल्यें थोर कुलीं " या चालीवर

जन हो डाकिणी या समजा । छलुनि नरातें देति इजा ॥ जनहो डाकिणि० ॥ निज कार्यास्तव वदति मधुर या, नच तें घडतां दरडाउनियां ॥ फसविति या मनुजा ॥ जन हो डा० ॥ भीति दाविति लालुच लाविती, मधुरवचें जणुं साखर पेरिति ॥ शेवटीं करिति कजा ॥ जन०॥

तर अशा लाखो डाकिणींना धुडकाविणारा हा प्रेम आहे असें पक्कें समजा. असो, आतां हिचा अगोदर बंदोबस्त करून नंतर गेलें पाहिजे.

---

## प्रवेश २ रा.

### स्थळः—हस्तिनापूर. राजवाडा दरबार.

---

( कचेरी भरली असतां )

**भालदार**—निग्हेबान मन अज दौलते जावदान तख्तनसीन शिकंदरे दराहपद मेहेरबान सलाम. ( नंतर दिवाणादी मुजरे करते वेळीं ) वजीरके अदाबोतसलीमातपे निगूहा रखियेगा मेहेरबान सलाम. सेनापती के अदाबो कोरनीसपर निगूहा रखियेगा मेहेरबान सलाम. शरीफ महमदके अदाब बंदगीपे निगूहा रखियेगा मेहेरबान सलाम. भक्तसिंहके सलामपे निग्हा रखियेगा मेहेरबान सलाम. मोदपुरीके उमराव प्रेमसिंह के आदाब तसलीमात परनिगूहा रखियेगा मेहेरबान सलाम. ( सर्व आपआपले जागीं बसतात. )

**बादशहा**—अय वजीर आपने दरबारमे आपने मुल्कके अमीर वो उमराव नवाब वगैरा हाजीर है के नहीं?

**वजीर**—हुजुरे अली सब नवाब वगैरा हुजूरके दौलत वो दामनकु दुवा करते है.

**बाद०**—अय वजीरः—

**वजीर**—खुदावत न्यामत.

**बाद०**—दो तीन सालका आरसा गुजरता है के आपने मुल्कमे बारीष नहीं पडता ! और इसलिये सब रय्यत खराब वो खिस्ता हो रही हे ! आज चंदरोजका अरसा गुजरता है के, एक आषक अल्लाहसे इस हालकी दरियाफता किई. उस्ने सव्वाल जबाब मुनासिब जानकर, हुजुरे अलिमे इरषाद किया है के, किसी षक्सकी ज्यवजेह पारसा हो उस्की खिजमते और बंदगी बलाये उजर करोतो, इन्शाह अल्ला बारीष पडेगा. अय वजीर, इसवास्ते तकियद करताहूं के, आपने मुल्क और शहरमे मुनादी होके, जिस किसीके कबीले पारसा हो; वो बिलफैल इस हुकुमके सुनतेही जल्द हुजूर पुरनुरमे हाजीर होवे. बाद हुजूरसे इन् आमकी सरफराजी होगी.

**वजीर**—अय षभाके अमीर वो उमराव जो किब्ले

अलीमसे इरषाद हुवा है; सबने सुना होगा. अब बिलफैल इस कामका सरंजाम होना चाहिये.

( बराच वेळ गेल्यावर कोणी बोलत नाहीं असें पाहून )

**राजा**—( अफसोसीसें ) इस जाय तआजुब और हैरतका मुकाम है के, इस मुल्कमे किसीकी ज्यवजेह पारसा नहीं है ! फिर यह दुनिया किस तराहासे आबाद हो !

**प्रेम**—हजूरकी सदोबिस्त सालकी उम्मर हो. गरीबपरवर, यह क्या मजकूर है ! अगरच ऐसी ओरत सइ दुनियेके अंदर न होतो जमी और आस्मा क्यौं कर रहे ! खुदावंत, इसखाने जादके घरमेभी पारसा औरत है.

**शरीफमहमद**—( विषाद पावून ) हजूर यह जो बयान हजूरमे किया है सब बर खिलाप है. क्यौं के, इस दुनिये फानीके अंदर मे किसीकी ओरतकुं नहीं देखताहूं के, पारसा हो ! मशल मषहूर है के नेक जन्ना लखलानत बदोंका सुमार नहीं. खेर ! जो इन्की ज्यवजेह स्वाहेबा पारसा होतीं तो किस वास्ते मुसल्मीनके हजुरी दरबारमे नोकरी करते ! अब अगरचे हुजूरसे इरषाद हो तो

एक हपतेमे इनकी पारसाह बिबीके साथ जमा करके एक महिने के अंदर हजूरमे हाजीर होताहूं.

**प्रेम**—अय किबले अलीम फिलहाल हमारा सितारा नहुस्तमें आगिरा है! जैसा के अब्रमे आफताब छुपा है, वैसाही हाल हमारा है. अगरचे हमारे दीन फिरेंगे तो हजूर वोही दीन फीर आइंगे! और पारसा ओरत तो हमारी है. इसमे बिलफैल कुछ सुबेह नहीं है. (जरा रागानें) जो शरीफमहमदखान मेरे घरपर जानेका इरादा रखते है तो कुछ मुजायका नहीं. मगर शर्तवाके जरूर है.

**शरीफ०**—हां, बेषक यह बात मुजको मंजूर है; येक शर्तसेके, मेरे फिर आतेतक, मेरे गयेबाद यह हजूरमे हाजीर रहे अगरचे मे इन्की ज्यवजेहसे जमा न कर आऊं तो यह सीर हाजर है; और कर जो आया तो इस्का. आब आयंदा जो मरजी मुबारकमे आवे सोही बजा है.

**बाद०**—वझीर, बहोत अछा दानुके इकरार लिक लेके शरीफमहमदकु रजा देना. मै नमाजकू उठताहूं.

## प्रवेश ४ था.

### स्थळः—मोदपुरींतील तुरुंग.

कामंदकी—

( मालकंस त्रिताल )

दुःसह वंदिवास मज झाला । होत असे वहु जाच जिवाला ॥ ध्रु० ॥ येथुन आतां सुटणें कैचें । घोर प्रतिज्ञा केली न सुचे ॥ पाहिन कधिं शव त्या मेल्याचें । उपाय माझा हरला ॥ दुःसह० ॥ १ ॥

( विचार करून ) हो, हो. कांहीं हरकत नाहीं !

हिरा अमोलिक मजपाशिं असे । देतां रक्षक जन संतोषे ॥ मत्सम मम भगिनी सदनिं वसे । ऐव-जि ठेविन तिजला ॥ दुःसह० ॥ २ ॥ होऊन बंधमुक्त ह्या रितीनें । मम हेतु साधिन वहु धृतिनें ॥ थकचि होउं सकल मत्कृतिनें । निश्चय माझा ठरला ॥ दुःसह० ॥ ३ ॥

( रखवालदारास वेदनायुक्त काकुळतीनें ह्मणते ) अहो संभाजीराव, इकडे या बरं. मला कसंसंच होतं ! आईग !!

**संभाजी**—काय होतें आहे कामंदकी बाई ?

**का०**—मला किनई कसंसंच होतं आहे ! कांहीं सुचत नाहीं ! तुह्मी कृपा करून तेवढे जेलरसाहेबांना इकडे घेऊन या, ह्मणजे ते मला पाहून माझी प्रकृति डाक्टर साहेबांना दाखवितील !

**सं०**—( जेलरास बोलावून आणतो )

**गणपतराव जेलर**—काय कामंदकी, काय ग होतें आहे तुला ?

**कामं०**—( वाईट तोंड करून ) रावसाहेब मला किनई कसंसंच होतं आहे ! मला बाई उघड सांगण्यास लाज वाटते. तर कृपा करून आपण एकटेच आंत याल तर आपणाला मी सांगतें !

**गण०**—हा मी आलों आंत. ( आंत जातो ) आतां तुला काय झालें तें सांग पाहूं ?

**कामं०**—( हळूच ) मला रोगबिग कांहींएक झाला नाहीं ! पण आपल्या पुण्याईनें मजपाशीं बरीच दौलत आहे ती नीट व्यवस्थेनें ठेविली नाहीं. आतां आपण यावेळेस मायबाप होऊन ती बंदोबस्तानें ठेविली तरच रहाणार आहे ! नाहींतर चोरापोरीं निरर्थक जावयाची !

ग०—कांहीं चिंता करूं नको. ती कशा प्रकारें बंदोबस्तांत ठेवावी तें सांग ह्मणजे झालें.

का०—हें पहा, मजपाशीं ह्या तायतळ्याचे पेटींत एक उमदा फारच किंमतीचा हिरा आहे; तो मी आपणास देत्येंच. शिवाय घराहून पण ह्याच्या तोडीचा दुसरा हिरा आणून देईन. ( हिरा देते )

गण०—( हिरा घेऊन लालचून ) पण तूं घरीं जाणार कशी ? येथून तुला जातां येणार नाहीं !

का०—रावसाहेब, हें आपलें बोलणें उगीच आहे झालं ! आपल्या हातांत सगळं कांहीं आहे. पण उगीच ओढून चंद्रबळ आणतां झालं !

गण०—तें कसें ?

का०—सांगतें ऐका. मला पहाटेस परसाकडे बाहेर यावंच लागतं. आणि त्यावेळेस मोगरे वगैरेचीं फुलें तोडण्यास जी माळीण येत्ये ती माझी वहीण असून मजसारखीच आहे. तिला त्यावेळेस माझे ठिकाणीं ठेवण्याची तजवीज संभाजीकडून करवा ह्मणजे झालं ! मी तिची फुलांची परडी घेऊन घरीं जाईन !

**गण०**—पण तो संभ्या कसें ऐकेल? शिवाय तूं कोणाच्या दृष्टीस पडलीस ह्मणजे आमचीं पुरीं बारा वर्षें!

**का०**—( जरा नखरा करून ) काय बाई तरी! अहो! हें तायतळं संभाजीला द्या ह्मणजे झालं! मी अंधार असतांच निघून जाईन. आणि दुसरे दिवशीं पहाटेस चार वाजतां आपली येईन ह्मणजे झालं! कोण पहाणार मला! बाप्यासारखे बाप्ये होऊन उगीच भ्यावं ह्मणजे काय?

**गण०**—बरें तर. पण पहा बरें संभाळ!

**का०**—कांहीं हरकत नाहीं.

---

## प्रवेश ५ वा.

### स्थळः—मोदपुरी, नदीकिनारा, पहाटेची वेळ.

**शरीफमहमद**—( स्वगत ) अल्लाहो गनी! इस शहर मोदपुरी मे आके हरएक तरहांसे अरामियत नसीब हुई! और बखुसी औकात कटती है. और पातशाह स-

लामतसे मुलाज्यमियतभी हांसील हुई! पर हैफ है के, जिस गुलरुके वास्ते गरीबुल वतन हो और खाक छानता हिंयातक आपहुंचा! उस्कोभी १५ रोजका अरसा गुजरता है के गली और कुचे फिरतांहूं, मगर मक्शद हात नहीं आता! अब मेरी ये कहावत हुई के, ना घरमे रहे न तीरथ गये मुंडे मुंडाये फजीत भये! देखो स्वाहेबों दुनिया बउम्मिद कायम है! और मे बद नसीब इस जहामे ना उम्मिद रहेताहूं! हैय! हैय!! हैय!!! अफसोस है! अफसोस है!! हजार अफसोस है!!! अय दिल, इसफिकर वो चिंतामे रहेगा तो उमीद जिंदगीकी नहीं है! (विचार करून) अब किसी मालन या लवंडीसे आस्नाई करे तो बिलफैल उस्के तुफेलसे मक्शदुल मक्सूदको पहोचे! इससिवा दुसरा इलाज न होगा!! (चार वाजलेले ऐकून) वल्ला, चार तो बजे! अब वोजू बनाके निमाज पढलेवे. (हात तोंड धुवून) ला इलाहा इल्लिल्ला महमदुररसुलल्लिल्ला. (समोर पाहून) कोई आपनेसे तो नजर आ रहा है! देखिये कौन है! (पाहून) ए तो कोई जन है! (तिला जवळ आलेली पाहून) अजी

आप कौन है? और कहांपर जाते हो? और आपका इसम क्या है?

कामं०—अय स्वाहेबो, मेरा नाम कामंदकी. मे इस शहेरकी रहेनेवाली और खास लवंडी रानी स्वाहेबकी हुं. मगर अब हजूर आपना इसम, रहेनेका पता बतलावे तो बंदीभी वाकेफगार हो.

शरीफ०—अजी, हमारे शहेरका पता क्या पुछते हो! हमारा शहेर हिंदमें खुदबखुद मशहूर है! जिस शहेरमे हम रहते हैं उस शहरको खास देहली कहते हैं! वहांके पादषाहके मुसाहेबोमेसे हुं.

कामं०—( स्वगत ) खरोखर, परमेश्वर मला सहाय्य आहे. आतां माझा पण मी खास शेवटास नेतें! असो. आतां ह्याजपाशीं साखर पेरली पाहिजे! ( उघड ) दिलमे तो शरम आती है! मगर कहे बगेरे जान जाने चाहती है! सुनिये स्वाहेब, जबां बंदिकी उठती नहीं है! मे आपसे कुछ अरज करने चाहती हुं!

शरीफ०—अय प्यारी, कहो तुमारी क्या अरज है? जो कहोंगे सो मे अलबत्ता करुंगा.

कामं०—स्वाहेबा, मेरे दिलका हाल कहूं तो एक

दास्ता हो ! मगर कुछ थोडासा जाहीर करती हूं के, मेरा दिल यहांसे घबराया है. सबब गुलामीसे ! क्यौ के गुलामी करनी पडती है ! इसवास्ते उम्मिदवार हुजूरसे हु. अगर मेहेरबानी करके बंदीको उक्देमे लावें तो मेहेरबानीसे बईद नहीं हू !

शरी०—( स्वगत ) मेरेकु जिस जनकी जरुरियात थी सो खुदानें भेजवा दीई ! ( उघड ) अय प्यारी यह क्या बडि बात है ? बंदको बदिल् वो जान कबूल है; मगर एक तोरसे मुतालिब मेरी बर लावे तूं; तो सायेद मुराद आपनीभी पावेतू ! दिल आबाद हो, गमसे अजाद हो; तुमाराभी इस काममे काम हो ! अगरच यह बात तुमसे हो सकती हो, तो, बेहेत्तर है वरना मतलब तुमारा हात आना मुष्कील है !

का०—जनाब, आपका क्या काम एसा मुष्कील दरपेस आया है के, जिस खातीर हुजुरकी तबियत मलाल है ? बंदिको जाहेर करे.

शरीफ०—अय गुलबदन, हमारे पादषहा सलामतने एक रोज आपने दरबारमे यह बातका मजकूर क्या के " किसिकी ओरत पारसा है वया नहीं ? सो किसीने जु-

बाब न दिया ! मगर यहांके राजाका जमाई प्रेमसिंहभी वहांपर हाजीर था ! उस्ने जुबाब दियाके " मेरे घरमे पारसा ओरत है. इस बारेमे मे बोलाके, हजूर, आजके जमानेमे किसीकी ओरत पारसा नहीं है ! अगरच इन्की ओरत पारसा है तो, इन्की ओरतके साथ एष वो असरत करके आताहूं ! कभी ना करके आया तो सीर हजूरमे बलाउजर कटा दऊंगा ! और जो इनकी ओरतके साथ जमा कर आया तो इनका सीर उतार लोगा ! यह शरत हमारे और उस्के दरम्यान वाके हुई है ! यह बात आपको मंजूर हो और हो सकती हो तो मुभा है, वरना साफबसाफ जुबाब दो !

का०—अरे, यह बात आपने क्या कही ! इस्की ओरत कमाल पारसा है ! किसीने इसका सायाभी ना देखा होगा; जमा तो क्या चिज हे ! !

शरी०—प्यारी, यह काम न होगा तो, बंदा जानको आपनी मार खंजर गुमावेगा ! और सुरत आपनी फिर न दिखावेगा ! !

का०—( विचार केल्यासारखें करून ) ओहो प्यारे, आपका दिल शदमे उठावेगा तो, बंदीको कब चेन आ-

वेगा ! अब आप शबरको काम फरमावे तो मे एक सलाह बताती हूं ! छोटपनमे हमारे और इस ओरतके हमजालियोमे खेलती कुदती थी, उस वक्त इसीके सरमगाहमे एक काला दाग हुब्बे बराबर था ! यह हकीकत आप उस्को कहोगे तो यकीन है के, वो यह बात मंजूर करके मर जावेगा ! फिर आप आपनी मुरादको पहोंचोगे !

शरी०—खुदावंत करीम साज है ! किसीको मायूस नहीं करता ! आछां, प्यारी, अब रुक्शद होता हूं. खुदा निग्हेबान है, जिदंगीबा खैर है तो, फिर आके ऐष वो असरत करताहूं ! ! ( जातो ).

का०—

॥ साकी ॥

केली होती दृढ प्रतिज्ञा, पार·पडली दैवानें ॥
त्या मेल्या प्रेमाचा वध मी, केंव्हां ऐकिन कानें ॥ सुदिनच तो होई । चिंता मज ती नच कांहीं ॥ १ ॥

## प्रवेश ९ वा.

### स्थळः—दिल्ली राजवाडा.

पादशहा—अय वजीर, अभितलख शरीफ महमद क्यौं नहीं आया. इसका क्या बाइष है ?

भालदार—मेहेरबान सलाम हुजूरकी उम्मर दराज हो. शरीफ महमद हाजीर हुवे.

शरीफ.—( मुजरा करून बसतो. )

पादशहा—क्यौं शरीफमंहमद, जो कामके वास्ते गयेथे उस्का क्या अंजाम हुवा? सो हुजूरमे बयान करो.

शरीफ०—गरीब परवर आपकी बदौलतसे जिस कामके वास्ते गयाथा उस्का सरंजाम बखुबी हुवा !

पाद०—हमको एतमाद किसतरहांसे हो के, ये तुमने काम बखुबी किया होगा ? बगैरे निसानीके तुमारी बात बिलकुल खिलाफ है !

शरीफ—जहांपना निसानी मे क्या कहूं ! हुजूरके सामने खिलाफबे आदबी और गुस्ताखी होती है ! मगर बगैर कहे जानभी नही बचती है ! मगर जो किबले अ-

लीमसे यौं इरषाद होता है तो, लाचार हुं ! इसके सर-मगाहमेः—

**पादशहा, वजीर**—( एकदम ) चुप रहे. ये क्या बात है ! किसीके पंजा दराज मत कर.

**पादशहा**—क्यौं प्रेमसिंह, यह बात जो शरीफमहमदने कही, यह सच है क्या झूट है ? सो हुजूरमे साफ साफ बयां करो.

**प्रेम०**—( खाली मान घालतो (

**शरीफ०**—किबले अलीम शर्त मुजब जो सजाके लायक यह है, वो हुजूरसे उम्मिदवार हुं के उस्का काम तमाम हो.

**पाद०**—प्रेमसिंह आज तुमको दारपर खेचना जरूर होगा. सो तुम तैयार हो के नहीं ?

**प्रेम०**—खुदावंत मे खुसीसे राजी हूं. क्यौं के, जो जबांसे करार किया उस्को अमलमे लाना जरूर है ! अगरच जुबांसे कहेकर फिर जाऊं तो तमाम आलीम क्या कहेगी ? बस, इस जिनेसे मरना बहोत बहेत्तर है. मगर कद्रे बातका तसविसा पेदा होता है के, जिस अल्लामापर इस खानेजादको इतमिनान था; उस्को जाके लानत करके

## प्रवेश ९ वा.

### स्थळः—दिल्ली राजवाडा.

पादशहा—अय वजीर, अभितलख शरीफ महमद क्यौं नहीं आया. इसका क्या बाइष है?

भालदार—मेहेरबान सलाम हुजूरकी उम्मर दराज हो. शरीफ महमद हाजीर हुवे.

शरीफ:—( मुजरा करून बसतो. )

पादशहा—क्यौं शरीफमहमद, जो कामके वास्ते गयेथे उस्का क्या अंजाम हुवा? सो हुजूरमे बयान करो.

शरीफ०—गरीब परवर आपकी बदौलतसे जिस कामके वास्ते गयाथा उस्का सरंजाम बखुबी हुवा!

पाद०—हमको एतमाद किसतरहांसे हो के, ये तुमने काम बखुबी किया होगा? बगैरे निसानीके तुमारी बात बिलकुल खिलाफ है!

शरीफ—जहांपना निसानी मे क्या कहूं! हुजूरके सामने खिलाफबे आदबी और गुस्ताखी होती है! मगर बगैर कहे जानभी नही बचती है! मगर जो किबले अ-

लीमसे यौं इरषाद होता है तो, लाचार हुं ! इसके सर-मगाहमेः—

**पादशहा, वजीर—**( एकदम ) चुप रहे. ये क्या बात है ! किसीके पंजा दराज मत कर.

**पादशहा—**क्यौं प्रेमसिंह, यह बात जो शरीफमहमदने कही, यह सच है क्या झूट है ? सो हुजूरमे साफ साफ क्यां करो.

**प्रेम०—**( खालीं मान घालतो (

**शरीफ०—**किबले अलीम शर्त मुजब जो सजाके लायक यह है, वो हुजूरसे उम्मिद्वार हुं के उस्का काम तमाम हो.

**पाद०—**प्रेमसिंह आज तुमको दारपर खेचना जरूर होगा. सो तुम तैयार हो के नहीं ?

**प्रेम०—**खुदावंत मे खुसीसे राजी हूं. क्यौं के, जो जबांसे करार किया उस्को अमलमे लाना जरूर है ! अगरच जुबांसे कहेकर फिर जाऊं तो तमाम आलीम क्या कहेगी ? बस, इस जिनेसे मरना बहोत बहेत्तर है. मगर कदरे बातका तसविसा पेदा होता है के, जिस अल्लामापर इस खानेजादको इतमिनान था; उस्को जाके लानत करके

आऊ! इसवास्ते जिस दिनकी रुक्शद हजूर पूरनूरसे मिले तो गुलाम परवरी और खानेजादीसे बईद नहीं. आगे जो मरजी मुबारकमे आवे सोही बजा है.

पाद०—यह बात वगैर जामीनके होना मोहाल है. अगरचे कोही जामीन तुह्मारा होतो अलबत्ता तुमारी रजा हमको मंजूर है.

प्रेम०—(स्वगत)

(वैभव माझें नष्ट. या चालीवर.)

मी हिंदू परदेशी असूनी। कोणी मजला ओळखिना ॥ राज्य यवन मोगलाइ येथें। कोणी वाली होईना ॥ मी हिंदू० ॥ ध्रु० ॥ राज्यभ्रष्ट मत्पिता जाहल्यापासुनि। सोसुन बहु तोटा ॥ बहुत संकटें टाळुनि मी कीं। झालों लहानाचा मोठा ॥ कोण भरंवसा मजवर ठेवी। जरि खचिंन लाखो नोटा ॥ होय जिवावर उदार ऐशा। जामिन मी देऊं कोणा ॥ मी हिंदू० ॥

गरीब परवर, मे इस हालमे गरीबुल वतन हूं! मेरा जामीन कौन होगा?

भक्तसिंह—( स्वगत ) ह्याच्या नांवावरून आणि वर्तनावरून आमचा जो अन्नदाता विक्रम त्याचा त्या घोर प्रसंगीं नाहींसा झालेला पुत्र प्रेम तोच हा आहे. ह्मणून

॥ **साकी** ॥

**विक्रमनृप–सुत–प्रेम खरा हा । ओळखिला म्यां**
**हृदयीं ॥ संकटसमयीं जामिन होणें । यासी अ-**
**नुचित नाहीं ॥ होईन जामिन मी । देइन निज**
**तनुची हामी ॥ १ ॥**

खुदावंत मे इस्का जामिन होता हूं. अगर यह आपने करारपर हाजिर न हुवा तो मेरा सीर हाजीर है.

पाद०—प्रेमसिंह, तुमको विस दिनकी रुक्शद है.

प्रेम०—बहोत आछा सरकार ! ( आश्चर्यानें )

“ नको हरी बाहेर जाऊं ” या चालीवर.

**ह्याची माझी ओळख नसतां । एकाएकीं मजला**
**हा ॥ जामिन झाला करुनी साहस । उदार आ-**
**पल्या प्राणा हा ॥ ध्रु० ॥ परोपकारी नर हा**

दिसतो । देवा मम अपराध सहा ॥ कारि उतराई ह्याचा परतचि । आणुनि मज दिवसांत दहा ॥ १ ॥

( जातो व पडदा पडतो. )

---

## प्रवेश ७ वा.

### स्थळः—मोदपुरी राजवाडा.

( दर्शिका कालीपूजन करते आहे इतक्यांत. )

प्रेम०—( रागानें. )

" बाळा घालुनिया गळा " या चालीवर.

हे दुष्टे हे जारिणी । मजासि असें त्वां फसवुनी ।
मरण समय माझा झणिं, आणिलास गे ॥ १ ॥
दुष्टे तव प्रेम–पाश । मानुनि मनिं सत्य खास ।
विश्वासें फसविलेंस, मजासि जारिणी ॥ २ ॥
वधुनि नीच यवन जात, घालुनि कर तत्करांत ।

रमशी मशिं करुनि घात । कपट दावुनी ॥ ३ ॥
वधचि तुझा उचित खरा । स्त्री—हत्या पापदरा ।
भिउनि मात्र धिक्कारा । देत मी तुला ॥ ४ ॥
तुजसाठीं चांडाळिणी । मम शिर हें दशम—दि-
नीं । भिन्न होय तनुपासुनि । भर्तृघातिनी ॥५॥

दर्शिका—( भिऊन )

" भैरवी राग. "

नाथा, कांहो रागें भरतां ॥ मज अबले वरि
आग अशी तुह्मि काय ह्मणुनि पांखडितां ॥ ध्रु० ॥
नाथा० ॥ आपण गेल्यापासुनि मींही । दारा-
चा उंबरठा तोही ॥ नातिक्रमिला सहसा पा-
ही । निष्ठुर भाषण करितां ॥ नाथा० ॥ १ ॥
निंदास्पद दूषणें देउनी । अवाच्य वचनें वदतां
वदनीं ॥ कोण्या दुष्टें मजविषयीं मनिं । कपट
भरविलें आतां ॥ नाथा० ॥ २ ॥

प्रेम०—

राग पिलु " उचलुनि कडेवर " या लावणीच्या चा०

दुष्टे करणि करुनि मांगाची । करिशी संपादणि

गे तीची । छपवणि करिसी व्यभिचाराची । हृदयीं सलतें । तव निंद्य कर्म पाहुनिया मन्मन जळतें ॥ १ ॥ त्या दिल्लीच्या सरदाराशीं । दुष्ट शरीफ महंमद याशीं । केला व्यभिचार सुखें ऐशी । खुण दावियली । भरसभेंत गुह्य स्थळिंची फजिती केली ॥ २ ॥ हें जरि ठावें असतें मजसी । पतिव्रता मम कांता ऐशी । दुष्टे, हामी, भरितों कैशी । मज फसविलें । विश्वासघात करुनीया मज मारविलें ॥ ३ ॥

हा दुष्टे नीचे ! धिक्कार असो तुला. आतां निर्भयपणें यथेच्छ वाग ! ( जातो. )

दाशि०—( शोकाकुल )

" मजवरि हें आलें संकट कैचें " या चालीवर.

प्रतिकुळ हें झालें, दैवाचि कैसें ॥ मज अडवें आलें, दैवाचि कैसें ॥ ध्रु० ॥ कोमल मन तें प्रेम पतीचें, मजविषयिं कसें दूषित झालें ॥ प्रतिकु० ॥ चाल ॥ प्रीति मजवरती, अजवरती; होती सुखकर ती, अजवरती ॥ प्राणहानि मजसाठीं,

त्यांची होइल दशम दिनीं, माशिं वदले ॥ प्रति-
कुळ हें० ॥ १ ॥

असो, असा शोक करीत बसण्याची ही वेळ नाहीं. आलेल्या विघ्नाचें निवारण कसेंही करून केलें पाहिजे ! ( आवेशानें )

" जरि असे धर्म मम साचा " या चालीवर.

जरि सत्यचि पतिव्रता मी । वांचवीन पतिच्या
प्राणा ॥ देइल यश पातिव्रत तें । करूनि साह्य
पति जिवदाना ॥ ध्रु० ॥ मी जरी, खचित अज-
वरी । दृष्टि परनरीं, केलि नच तरी, देऊं यश
दाना, मज कैलासपतीराणा ॥ जरि सत्यचि० ॥

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ८ वा.

### स्थळः—दिल्ली. भक्तसिंहाचें घर.

पद्मावती—प्राणनाथ, आज आपल्या मुखचंद्रावर कां बरं अनेक दुष्ट विकारांचं प्रतिबिंब दिसतं ?

भक्तसिंह—हे देवी ऐकः—

## दिंडी.

**विक्रमाच्या हा अन्नसेवनानें ॥ थोर झाला मम देह, तत्सुतानें ॥ प्रेमसिंहें अति-घोर ती प्रतिज्ञा ॥ केलि, परि तें अनुचितचि कर्म सुज्ञा ॥१॥**

पद्मा०—प्राणनाथ, अशी काय बरं त्यानं प्रतिज्ञा केली ?

भ०—प्रिये, ऐक-

## साकी.

**पतिव्रता मम कांता सत्यचि । घडेल जरि हें मिथ्या ॥ मम शिर सत्वर हजर करिन मी, नृपचरणीं कथिं सत्या ॥ ऐसा घोर पण । केला प्राणप्रिये जाण ॥ १ ॥**

पद्मा०—प्राणनाथ, त्या महाभागाची स्त्री पंचकन्यांप्रमाणें असेल ह्मणूनच त्यानं ही घोरतर प्रतिज्ञा केली असेल.

भ०—देवी मला पण तुझ्याच प्रमाणें प्रथम वाटलें होतें ! पण:—

प०—इडापिडा टळो, अमंगळ जळो ! बरं पुढें ?

भ०—शरीफमहंमदानें तिला व्रतापासून पराङ्मुख केलें ! आणि त्यामुळें प्रेम भ्रष्टप्रतिज्ञ होऊन त्यास खालीं पहाणें भाग पडलें !

पद्मा०—प्राणनाथ, व्रत मोडलं, हें त्याच्याच सांगण्यावरून कीं कांहीं त्याला चांगला आधार आहे ?

भ०—प्रिये, त्यानें तिच्या जननेंद्रियावरील खूण प्रचितीसाठीं स्पष्ट करून दाखविली !

पद्मा०—एवढंच ना ! एवढ्यावरूनच तिच्या व्रतभंगाबद्दल खात्रीलायक पुरावा होत नाहीं ! कारण ती खूण त्यानं अंतःपुरांतील दासीजनांकडून समजून घेतली नसेल कशावरून ?

भ०—प्रिये, तूं ह्मणतेस तें खरें आहे ! पण ही खूण पटतांच त्यानें मान खालीं घालून मी खोटा असें दर्शविलें !

पद्मा०—अरेरे फार वाईट झालं ! प्राणनाथ, त्याच्या प्रतिज्ञेप्रमाणें त्याचं शिर गेलं असेल ! आणि ह्मणूनच आज आपणांस औदासीन्य आलं वाटतं ?

भ०—नाहीं नाहीं प्रिये, त्याचें शिर अद्याप गेलें

नाहीं. पण आज तो एका तासांत हजर झाल्यास खचित-च आपल्या प्राणास मुकेल !

प०--ह्मणजे ? ह्यांतला भावार्थ मी पुरता समजल्यें नाहीं.

भ०--तो भ्रष्टप्रतिज्ञ होतांच त्यानें, विश्वास-घात करणाऱ्या स्त्रीस धिक्कार देऊन येईपावेतों बादशहाजवळ वीस दिवसांची मुदत मागितली.

प०--बरं मग ?

भ०--बादशहानें माझी जामिनगिरी कबूल करून त्यास रजा दिली. त्यास आतां अवघा एक कलाक उ-रला आहे; ह्मणून मला वाईट वाटतें !

प०--प्राणनाथ, वाईट वाटून घेण्याचं कांहींही कार-ण नाहीं. कारण क्षत्रिय मरणाला भीत नसतात. तो ख-चितच वेळेवर येऊन हजर होईल.

भ०-- ॥ दिंडी ॥

अंत माझा होणार ह्मणुनि त्याची ॥ नसे चिंता
परि दुःख वेगळेंची ॥ जरी एका तासांत हज-
र होई ॥ प्रेमराणा, तरि व्यर्थ घात होई ॥ १ ॥

प०—प्राणनाथ, तो आल्यानं आपणास आनंद व्हावयाचा, असं असतां आपण असं उलटं काय ह्मणतां ?

भ०—

" वीर शिरोमणी सकल धनुर्धर " या चालीवर.

**अज्ञान पुरें वसे त्वदंगीं विचार करि अंतरीं ॥ होइल अंत तयाचा जरी ॥ गोरगरिब किति भरतीं पोटें त्याच्या असऱ्यावरी ॥ मरतिल तडफडुनी सत्वरीं ॥ किति झाले तरि राजपुत्र तो सदाचरण आचरी ॥ अनिष्टचि घात तयाचा परी ॥ चाल ॥ मी यःकश्चित् जिव ह्या पृथ्वीवरी ॥ मजसमान लाखों प्राणि असति भूवरी ॥ परि एकहि धडना चिंध्या भाराभरी ॥ चाल पहिली ॥ मम मरणाचें दुःख तुह्मासचि, त्याच्या मरणें परी ॥ सर्व जन साश्रु होय घडिभरी ॥**

( इतक्यांत कोतवाल येऊन )

कोतवाल—( खिन्न मुद्रेनें ) महाराज, सरकारांतून आपणांस आतांचे चार वाजतां फांशीवर चढविण्याचा सक्त हुकूम झाला आहे; तो नाइलाजास्तव आपणांस कळ-

विण्यास आलों आहे ! तरी त्या वेळेवर आपण वधस्थानीं हजर झालें पाहिजे.

भ०—फार उत्तम आहे ! मी वेळेवर वधस्थानीं हजर होतों ! जा. ( कोतवाल मुजरा करून जातो. नंतर स्त्रीस ) प्रिये, चार वाजण्यास फक्त घटके दीड घटकेचा अवकाश आहे, ह्मणून आतां मला जास्त बोलण्यास अवकाश नाहीं ! पण एवढेंच सांगतों कीं:—

( प्रतिकुळ होइल कैसा कृष्ण. या चालीवर )

दुःख न करि माझ्यामागें त्वां सुखी रहावें ॥ जिवापाड मम बाळाचें अवन तें करावें ॥ मित्रवर्ग उपकारेंची तोषवीत जावें ॥ प्रेम धरुनि परमात्म्याची भक्ति तूं करीं गे ॥ १ ॥ जातसें मि दुर्दैवानें मृत्युच्या करीं गे ॥ गुह्य गूज तुजला कथितों मानसीं धरी गे ॥ ध्रु० ॥ अन्य कांहिं कथितों कांते तेंवि आचरावें ॥ प्रेमसिंह साहस करितां त्यासि करुं न द्यावें ॥ शपथ मम व मत्पुत्राची घालूनी वदावें ॥ 'दीन आह्मि रक्षा' ऐशी प्रार्थना करी गे ॥ जातसें० ॥ २ ॥

श्री ... संग्रहा

( जावयास निघतो )

पद्मा०—( पदर धरून ) प्राणप्रिया, मला एकटीला टाकून कुठें जातां? मी येतें बरोबर!

भ०—प्रिये, स्त्रियांना पतिआज्ञा मान्य करण्यांत फायदा आहे.

( असें ह्मणून पदर हिसकावून जावयास लागतो. पद्मावती-ही पण त्याच्या मागोमाग जाते. इतक्यांत त्यांचा मुलगा भावसिंह सात वर्षांचा शाळेंतून आपल्या घरीं येत असतां मध्यें आईबापांस पाहून )

भावसिंह—बाबा, बाबा, आज तुह्मी असे कुणीकडे चाललां. आणि आई कशाला येते आहे तुमच्या मागोमाग?

भ०—( त्याला पोटाशीं धरून ) बाळा तुझ्या जनकाच्या अन्नदात्याच्या मुलाचा प्राण वांचावा ह्मणून त्याच्या ऐवजीं मी फांशीवर चढण्यास जात आहें!

भा०—बाबा, फांशी ह्मणजे काय? मला घेऊन चला. मी चढेन फांशीवर!

भ०—( गहिंवरून ) बाळा तुला समजत नाहीं! बाळा फांशीवर चढणें म्हणजे कांहीं खेळ आहे असें ना-

हीं ! तर फांशीवर चढणें म्हणजे जीव देणें होय ! म्हणून बाळा मी जीव देण्यास जात आहें !

**भाव०**—बाबा, असें आहे तर मी येतों तुमच्या बदलीं जीव देण्याला !

**भ०**—राजाज्ञेप्रमाणें मलाच जीव देणें उचित आहे !

**भा०**—बाबा, तुह्मी ह्मणत होतांना कीं, तूं कोणी दुसरा नाहींस, माझे ठिकाणींच तूं आहेस म्हणून ?

**भ०**—तें खरें, पण बाळा, तुला अजून ईश्वराचें आश्चर्यकारक सृष्टिसौंदर्य पाहून आपणांस कोण म्हणून ओळखून घ्यावयाचें आहे ! तें ज्ञान होईपर्यंत तुला ह्या जगांत राहून परोपकारी झालें पाहिजे !

**भा०**—मी ऐकायचा नाहीं. मी तुमच्याबरोबर येणार ! ( तिघे वधस्थानीं जातात ) इतक्यांत–

**प्रेमसिंह**—( स्वगत ) अरे, आज मला मोदपूर सोडून दहावा दिवस आणि रजेचा विसावा दिवस ! आजच चार वाजतां मला माझे वधस्थानीं हजर झालें पाहिजे ! दिल्लीस येऊन दाखल झालों. चार वाजण्यास अगदींच थोडा अवकाश आहे ! त्यांतल्या त्यांत वेळ घेऊन प्रेमळ भक्तसिंहास भेटून नंतर मृत्यूचे हातीं पडावें! (पुढें जाऊन)

हेंच भक्तसिंहाचें घर ! ( पाहून ) हें काय ? येथें कोणी-च दिसत नाहीं ! हाय ! ! हाय ! ! !

राग पिलु " बायानों ध्या सोडोनी थकली ही पाणि० " या चालीवर.

चंद्राविण रजनी जैसी । नक्षत्ररहित तें गगन ॥ उदकाविण सरसी जैसी । फलपुष्प रहित उप-वन ॥ तद्वत कीं न दिसती कोणी । येथें हें शू-न्यचि सदन ॥ चाल ॥ हाय ! हाय ! ! घात-चि झाला ! ! ! भक्तसिंह निज वचनाला । स्म-रूनीया जिव देण्याला । गेला मम प्राणविसा-वा ॥ १ ॥ ॥ चाल ॥ म्यां दुष्टे त्या सुकृतीचा । साधियेला कैसा दावा ॥ ध्रु० ॥

( विचार करून ) बरें त्याची स्त्री आणि पुत्र हीं दो-घें कुणीकडे गेलीं असावींत बरें ? मला वाटतें त्यांनीं त्या-चेंच अनुकरण केलें असावें हें उघड आहे ! कां कीं,

साकी.

लालन पालन करुनि आजवरि । जेणें सौख्यचि

हीं ! तर फांशीवर चढणें म्हणजे जीव देणें होय ! म्हणून बाळा मी जीव देण्यास जात आहें !

भाव०—बाबा, असें आहे तर मी येतों तुमच्या बदलीं जीव देण्याला !

भ०—राजाज्ञेप्रमाणें मलाच जीव देणें उचित आहे !

भा०—बाबा, तुह्मी ह्मणत होतांना कीं, तूं कोणी दुसरा नाहींस, माझे ठिकाणींच तूं आहेस म्हणून ?

भ०—तें खरें, पण बाळा, तुला अजून ईश्वराचें आश्चर्यकारक सृष्टिसौंदर्य पाहून आपणांस कोण म्हणून ओळखून घ्यावयाचें आहे ! तें ज्ञान होईपर्यंत तुला ह्या जगांत राहून परोपकारी झालें पाहिजे !

भा०—मी ऐकायचा नाहीं. मी तुमच्याबरोबर येणार ! ( तिघे वधस्थानीं जातात ) इतक्यांत—

प्रेमसिंह—( स्वगत ) अरे, आज मला मोदपूर सोडून दहावा दिवस आणि रजेचा विसावा दिवस ! आजच चार वाजतां मला माझे वधस्थानीं हजर झालें पाहिजे ! दिल्लीस येऊन दाखल झालों. चार वाजण्यास अगदींच थोडा अवकाश आहे ! त्यांतल्या त्यांत वेळ घेऊन प्रेमळ भक्तसिंहास भेटून नंतर मृत्यूचे हातीं पडावें! (पुढें जाऊन)

हेंच भक्तसिंहाचें घर ! ( पाहून ) हें काय ? येथें कोणी-च दिसत नाहीं ! हाय ! ! हाय ! ! !

राग पिलु " बायानों घ्या सोडोनी थकली ही पाणि० " या चालीवर.

चंद्राविण रजनी जैसी । नक्षत्ररहित तें गगन ॥ उदकाविण सरसी जैसी । फलपुष्प रहित उप-वन ॥ तद्वत कीं न दिसती कोणी । येथें हें शू-न्यचि सदन ॥ चाल ॥ हाय ! हाय ! ! घात-चि झाला ! ! ! भक्तसिंह निज वचनाला । स्म-रूनीया जिव देण्याला । गेला मम प्राणविसा-वा ॥ १ ॥ ॥ चाल ॥ म्यां दुष्टे त्या सुकृतीचा। साधियेला कैसा दावा ॥ ध्रु० ॥

( विचार करून ) बरें त्याची स्त्री आणि पुत्र हीं दो-घें कुणीकडे गेलीं असावींत बरें ? मला वाटतें त्यांनीं त्या-चेंच अनुकरण केलें असावें हें उघड आहे ! कां कीं,

## साकी.

लालन पालन करुनि आजवरि । जेणें सौख्यचि

दिधलें ॥ तद्विरह तयां दुःसह होउनि । तन्मार्गी अनुसरलें ॥ शंका कां घ्यावी ? ॥ ऐशी जनरीति बरवी ॥ १ ॥

( घड्याळ पाहून ) अरे ! चार वाजण्यास अगदींच थोडा अवकाश आहे ! ह्यावेळीं मी वधस्थानीं गेलों नाहीं तर विनाकारण निरपराधी राजभक्त भक्तसिंह प्राणास मुकेल ! येथून वधस्थान बरेंच लांब आहे असें वाटतें ! कारण मी अजून दिल्लीच्या मध्यचौकांतच आहें ! आतां धांवत गेलें पाहिजे ! ( चालण्यास लागतो व मध्येंच आजूबाजूस कलकलाट पाहून ) अरे, हा काय चमत्कार !

" गड्यानों कृष्ण गडी आपुला " या चालीवर.

जन हे वधस्थळीं जाती । मुखानें मम निंदा करिती ॥ मज ऐवजीं व्यर्थ ह्मणती । भक्तसिंहासि फांशि देती ॥ मुखानें तद्गुण वर्णीती । धीर आणि परोपकारि किती ॥ प्रिय मित्र बहुत कष्टविला । धिक्कार असो मम तनुला ॥

असो ( मोठ्यानें ) अहो नगरवासी जनहो ! अहो

राजसेवक हो ! अहो ज्याच्याकारितां त्या भक्ताला फांशी देतां आहां, तो मी प्रेमसिंह ! ज्यानें स्त्रीच्या विश्वासावर घोरतर प्रतिज्ञा केली, तो मी अविचारी प्रेम देहांतशिक्षा भोगण्यास हजर होत आहें ! ह्मणून त्याला सोडा आणि मी येईपर्यंत क्षण एकाची वाट पहा ! ( असें मोठ्यानें ओरडत धांवत जातो )

**भक्त०**—प्रिये, बाळा, हें वधस्थान ! ही माझा प्राण घेणारी सामुग्री ! आणि प्राणधनावर घाला घालण्याकरितां यमाचें अनुकरण करणारा हा मांग पाशापाशीं कसा तयार आहे; हें पाहिलेंत काय ? हे शहारे उत्पन्न करणारे सर्व प्रकार तुमच्याच्यानें पाहवणार नाहींत. ह्मणून—

राग मालकंस. ताल त्रिवट.

**कांते सदना जाई । निज कुमरासह सुखरुप राही ॥ कांते० ॥ ध्रु० ॥ दुष्ट भयंकर प्रकार ऐसा । तुमच्यानें पाहवेल कैसा ॥ यास्तव माझी आज्ञा सहसा । मानुनि बाळा घेऊनि जाई ॥१॥कां०॥**

पद्मा०—

गरबी, दादरा.

प्रियकरा असा कसा विचार सांगतां ॥ कळून वळून मम प्रिय सौभाग्य लुटवितां ॥ ध्रु० ॥ मज समक्ष हा प्रकार साहुं मी कसा ॥ मलाच फांशिला चढूनि तोडुं द्या घसा ॥ पुढें तुह्मास उचित खचित करित तें वसा ॥ पती अर्थीं स्त्रियांसि मरण सुखद तत्त्वतां ॥ प्रि० ॥

मांग—महाराज, चला आतां, बायकापोरांचा लोभ सोडून ईश्वराचें नांव घ्या. आतां चार वाजतील. चला.

भ०—बाबा मी तयार आहें ! मात्र फांस मी आपल्या हातानें घालून घेईन. शेवटपर्यंत तूं मला शिवूं नये, एवढेंच तुजपाशीं मागणें आहे !

मां०—बरें आहे. पण वेळ गमावूं नका. नाहींतर तुमच्या बदलीं मला चढावें लागेल फांशीवर !

भ०—( गहिंवरून ) प्रिये, बाळा येतों बरें !

( पद्मावती व भावसिंह त्याचा पदर धरतात तो हिसकावून फांशीवर चढण्यास लागतो )

५०—( शोकानें )

( फुलतांचि कुसुम ते येति मधुप धांवोनी, या चालीवर. )

हाय हाय । करूं मी काय । नसुनि अन्याय । पहा मी मरतें । पहा मी जळतें ॥ हें काय दिसतसें मला मज न तें कळतें ॥ रे दुष्टा । जड पापिया । कपटि निर्दया । प्रेमपिशाचा प्रेमपिशाचा ॥ फसविलें करुनिया दुष्ट कर्म रे नीचा ॥ सर्वस्वीं । बुडल्यें अतां । त्वरित उपजतां । मृत्यु तत्त्वतां । मजसि जरि येता । मजसि जरि येता ॥ तरि दुःखमुक्त होतें मीरे भगवंता ॥ चांडाळा । यवना अतां । करि कृतार्थता । वरुनि शांतता । राज्य करि दुष्टा । राज्य करि दुष्टा ॥ हें धर्ममूळ तुटणार क्षणें पापिष्टा ॥ बा तपा । निराश्रितपणा । वरुनि भणभणा । फिरशि तूं आतां । फिरशि तूं आतां ॥ गतधवा तशिच विद्याहि तुला अनुसरतां ॥ हे विद्ये । चिंता तुशीं । न कांहीं तशी । अनंदें रमशि । परपुरुषिं बाई । परपुरुषिं बाई ॥ परि केलें मज पाहिजेच सार्थक कांहीं ॥ हे

**कांत । नच करा घात । जोंवरी अंत । होय मम तनुचा । होय मम तनुचा ॥ ना तरी शपथ माझीच लोभ मज तुमचा ॥**

( फांशीच्या दारकापाशीं भक्तसिंहास पाहून ) हा नाथ ! हा जगदीश्वरा ! मीं असा तुझा काय बरं अन्याय केला ? आतां मी वैधव्यदुःख कसं भोगूं ! ! प्राणनाथ, थांबा थांबा ! मज आधीं प्राण देऊं नका ! मी प्रथम पुढें जात्यें तोंपर्यंत धीर धरा ! ! ( मूर्छित पडते. )

**भाव०**—( आईस मूर्छित पाहून ) आई, तुला कायग झालें ? कोणी मारिलें होय ? ( असें ह्मणून तो तिच्या तोंडाकडे पहात बसतो )

**भक्त०**—( फांस गळ्यांत घालण्यास सिद्ध होतो इतक्यांत )

**प्रेम०**—( नेपथ्यांत ) अहो नगरवासी जनहो ! ( इ० पूर्वोक्त ह्मणतो )

**भक्त०**—( ऐकून ) हाय हाय ! क्रूरकर्मा दैवा, ऐन वेळीं घात केलासना ? आतां तो येथें येण्यापूर्वीं फांस घ्यावा हें बरें. ( फांस घालतो इतक्यांत कोतवाल वर चढून फांस काढून )

कोतवाल—भक्तसिंह, थांबा. तो आपला सत्यप्रतिज्ञ प्रेमसिंह आला आहे, यासाठीं आपण फांशीखालीं उतरा.

भ०—नाहीं नाहीं, मी उतरणार नाहीं. मी राजाज्ञा मोडणार नाहीं !

कोत०—मीं बादशहाकडे निरोप पाठविला आहे कीं प्रेमसिंह अगदीं वेळेवर वधस्थळीं हजर झाला आहे, करितां प्रेमसिंहास फांशी द्यावें किंवा भक्तसिंहास द्यावें ? त्याचें उत्तर येईपर्यंत तुह्मांस थांबलें पाहिजे.

( भक्तास घेऊन खालीं उतरतो इतक्यांत प्रेमसिंह येतो )

प्रेम०—( भक्तसिंहास आलिंगून )

( मुला सांग नृपतीस संदेश. या चालीवर. )

अहा धन्यरे धन्य तूं भक्तसिंहा । मित्र तरि तुज समानचि असावा ॥ ध्रु० ॥ अहा० ॥ करुनि उपकार तूं स्वकुळ उद्धारिलें । देउनी प्राण ते मजचि करितां ॥ घातकी दुष्ट मी स्मरुनि नच तें मनीं । शेवटीं दीधलें काळ हातां ॥ १ ॥अ०॥ नसुनि तुझि माझि जन्मांत ती ओळखी । बांधि-

लें मज तुवां ऊपकारें ॥ फिरफिरुनियां अती आठवूं तें किती । धन्य तव जननि कीं जनक वारे ॥ २ ॥ अहा० ॥

( इतक्यांत दूत येतो. )

दूत—कोतवालसाहेब, उभयतां सरदारांपैकीं कोणालाही फांशीवर न चढवितां उदईक दरबारांत घेऊन यावें, असा हुजुरांतून हुकूम आहे.

को०—बरें तर.

पडदा पडतो.

---

## प्रवेश ९ वा.

### स्थळः—दिल्ली. राजदरबार.

---

बादशहा—सुभान अल्ला क्यौं न हो! दोस्तदारी और जांनीसारी इसीकुं कहतें है. के, जेसी भक्तसिंहने आपने दोस्तके साथ आदा की! बस, अय भक्तसिंह तुमारी य खुबी और असलुबी देखकर नेहायत दरजेकी

खुसी हांसील हुइ. बस इस खुस खबरीके बाइससे तुमारी नोकरी मुवाफ करनेमे आती है. अब हमारे खजाना अमराहसे बैठे तनखुवा लिया करो.

**भक्त०**—जहापनाह, बंदेको तारीफ करनेकी कुछ जरुरत नहीं है. क्यौं के, खुदावंत करीमने इनसानको असरफुल मखलुकात कहा है. बस, इनसानको चाहिये के दोस्तके काम आवे. मे तो किसी लायकका नही हूं!

**बादशहा**—आछा, प्रेमसिंह तुमारी भी जितनी तारीफ करे उतनी थोडी है! हमको एतबार नहीं थाके तुम जानकी आस छोडके मुदतपर हाजीर होगे! मगर तुमारी जेसी सचाई इस जहामे कीसी ओरसे न होगी!

**प्रेम०**—खुदावंत न्यामत, मरना तो एकदफे जरूर है फिर जवां खोटी क्या वास्ते करना? और इभरत के कंकरे कर लेना इसमे क्या हांसिल है? रास्त जबांमे हरकोई राजी होता है.

**चोपदार**—हुजुरे आली दरवाजे के उपर मोदपुरीसे एक तायफा आया है. मुजरा करने के वास्ते.

**बाद०**—बहोत आछा. आने द्यो.

**दार्श०**—( मुजरा करून उभी रहाते )

प्रेम०—( तिला पाहून तिटकाऱ्यानें मनाशीं ) शिव शिव ! ही काळें तोंड घेऊन येथें माझ्या तोंडास प्रत्यक्ष काजळ फासण्यास आली आहे ! हा रांडे ! ! ! ( असें ह्मणून खालीं पहातो )

वजीर—( कलावंतिणीस ) अजी मुजरा होने द्यो.

द०—

केरवा. पंजाबी ठेका. ( शंकित मानस कां मज दिसतां, या चालीवर. )

गादि सलामत होवे तेरी । सलामत तेरी । अ-
बादी तेरी ॥ गादि० ॥ आपकि कीरत होवे ज-
गतमे । चाहो रैयत दिल्से प्यारी ॥ गादि० ॥
हम गरिबोंके तुम है मालिक । ( हात जोडून )
आज रखो तुम लाज हमारी ॥ गादि० ॥

बाद०—अजी तुमारा गाना और नाच देखके हम बहोत खुष हुवे है, इसवास्ते इनआमकी जो कुच्च उम्मेद रखती हो सो मांगो ख़ुवी मिल जायगी.

दर्शि०—किबलेह अलीम अगर कोल व इकरार करें

तो यह लवंडी आपनी जबांको हिलावे. मुजको कुच जरकी खवाहिष नहीं है !

बाद०—जब क्या चाहिये सो बयान करो, हालफिलहाल हुजूरसे वो बात मंजूर होगी उसमे कुच सुबेह नहीं है.

द०—अय किबले अलीम, आपने फरमाया सो यह लवंडी कबूल करती है मगर मुजसे कोल क़रार सिवा कुच मांगा नहीं जायगा !

बाद०—बहोत खुब, कोलकरार है.

द०—जहपना, आपके दरबारमे शरीफमहमद करके सरदार है ?

बाद०—हां बेशक. ( दाखवून ) वो बैठे है.

द०—मालीक, जब यह मोदपुरीके अंदर कुच कामके वास्ते आये रहे उस दिन इनोने मेरे मकानपे आके एक लाख अशरफी करके मेरे साथ षबबाष होके अशरफी दिये बगैर चोरके मुवाफीक आपके दरबारमे आके छुप रहे. और ऐसाभी कहते रहे के दिल्लीके तक्तका वारीसदार मे हुं. खैर ! ओ कुचभी हो. गरीबके उपर मेहरबान होके

इन्के पाससे मेरे करारकी रक्कम दिलवानी चाहिये हजूर, यह मेरी अरज है.

बाद०—वाह वाह शरीफमहमद तुमने बहोत बुरा काम किया. असनाइ करके किसीको फसना यह नादानका काम है! खैर, हुवासो हुवा! अभिके अभी उन्को अशरफी पहुंचाव.

शरीफ०—खुदावंत, यह गुणीका झुट बोलती है! मेने इसीका घरभी देखा नही है तो सुरतकी क्या बात है? और एषवो आराम क्या चीज है? यह मे बिलकुल समजता नहीं हूं!

द०—खुदावंत, यह लाख अशरफीके सबबसे झूट केहेता है. खैर! यह जो तक्तके सामने कुरान उठाके कसम खायगा तो मे चली जाउंगी. आशरफी क्या चीज है?

बाद०—क्यौं शरीफ महमद?

शरीफ०—जहापनाह, मे कुरान उठाके कसम खाता हूं के, मेने इस रंडीका घरभी देखा नहीं! इस्की सुरतभी कभी देखी नहीं! दुसरा क्या कहूं? इसका नामभी सुना नहीं!

द०—हुवा सरकार. ( बुरखा घेते. )

वाद० वजीर इ०—( आश्चर्यानें ) अरे ये क्या ? इसीने बुरखा क्यौं लिया ? ( पाउस गडगडतो. )

वाद०—अल्लाहोगनी आस्मानसे बादल गरजताहै और बिजली तडफती है ! षायद ये कोई पारसा ओरत है !

द०—हे पिताजी मी गणिका नाहीं. परंतुः—

"प्रियासी रमवाया जाऊं" या चालीवरं.

दयाळा, त्याची मी वनिता ॥ ध्रु० ॥ मदर्थ दुर्धर पण तो केला ॥ कपटें परि अरिनें जिंकीला ॥ दयेसि तुमच्या अपात्र झाला ॥ वर्तविलें घाता ॥ दयाळा० ॥१॥ चन्द्रकांतिसम तेज जयाचें ॥ मधुर–अमृतसम भाषण वाचे ॥ प्रेमसिंह हें नामचि ज्याचें ॥ तो मम जिवदाता ॥ दयाळा० ॥ २ ॥

( पाऊस पडूं लागतो. )

सर्व०—क्या, ये प्रेमसिंहकी पारसा ज्यवजेह !

वाद०—( गहींवरून तिच्या पाया पडतो. ) अय प्यारी बेटी, मेरी बहोत बेवकुबी हुई के शरीफमहमदके

बातका एतबार रखा! और कुछभी ख्याल कियाविना प्रेमसिंहको फासीकी सजा दिया, यह मेरा बडा गुन्हा है! अय बेटा यह गुन्हेकी तावेदार गुलामपर निग्हा करके मुवाफी होना चाहीये! यह हरामखोर शरीफमहमदने यह गरीब पारसा ओरतके उपर झुटी तोहमत डालके प्रेमसिंहको नाहक आफतमे डाला! (शरीफास) अये गवार काफर शरीफमहंमद, दुसरेको खोटी आफतमे डालके जान लेनेका क्या बाईषथा? और तुने जो सरमगाहपरकी निसानी बतलाई वो काय परसे? तेने तो इस्का मोभी देखा नहीं ऐसा कुरान उठाके कबूल किया है! गद्धे सच्ची सच्ची बात कहेदे.

शरीफ०—गुन्हा माफ होगा सरकार! हिंदु लोग मुसलमीनसे चढते दरज्जेपर है और नेकीसे चलनेवाले है. ऐसी हुजूरपूरनूरकी खात्री होगी तो, दरबारमे मुसलमीनोका दरज्जा कम होगा इसवास्ते हिंदु झुट है ये सावीत करके वतानेके लिये मेने ऐसा बुरा काम किया! और यह आमास्वाहेबके दुसरे माकी लवंडी कामंदकी जो खराब चालकी परेज है, उसके साथ यारी करके यह निसानी पूछ लियाथा.

**वाद०**—अय बेवकुब, यह तुने क्या किया? आछा तेरेकु दारपर खेचनेमे आयगा (प्रेमसिंहास) अयदोस प्रेमसिंह, तुम बिलकुल गुन्हेगार नहीं हो. खुदाने आज आछा दिन बताया के तुम और तुमारी पारसा ओरत यह दरबारमे हाजीर हो. जिसलिये आज मेरी सब रैयत, बहोत बारीष गिरता है उसलिये खुष हुई है. मेरा गुन्हा माफ होना चाहिये.

**प्रेम०**—खुदावंत आपने बराबर इन्साफ मुजब काम किया. इसमे किसीका कुछ कसूर नहीं. फक्त यह मेरे नसिबेकी यारी थी!

**वाद०**—अय प्यारी बेटा, अब आप बिलकुल अफसोसी करना नहीं. मेरे गुन्हेकी मुवाफी करो. शरीफमहमद जो खरा गुन्हेगार है उस्को अभी दारपर खेंचनेकी सजा देता हूं.

**द०**—पिताजी यांत आपला कांहींही अपराध नाहीं. त्या वेळेस माझं दैव अनुकूल नव्हतं. तें या वेळेस प्रियपतीच्या कडकडीत सत्यव्रतामुळें अनुकूल होऊन येणारी काळिमा नाहींशी झाली. (प्रेमास) प्राणनाथ, ही आपली दासी आपणास शरण आहे.

प्रेम०--

( रामसखा वनीं जाई, या चालीवर. )

धन्य सती तूं असती । व्यर्थ दुखविलें तव हृद-यासी ॥ ध्रु० ॥ धन्य० ॥ गंगोदकसम शुद्धचि त्वन्मन ॥ असतां म्यां दुष्टें तुज लांछन ॥ दिध-लें नच जाणियलें ॥ तव पातिव्रततेज–रवीसी ध-न्य० ॥ १ ॥ ह्या कृत्याचा अनुताप मला ॥ फा-रचि मम हृद्यांतरिं झाला ॥ परि मी भोगिन दिधलें । रायें शासन योग्यचि मजसी॥ध०॥२॥

( राजाकडे पाहून )

तुमची आज्ञा शिरसा वंदिन ॥ आनंदानें फां-शिस जाइन ॥ पापमुक्त होइन मी । कांते क्षम्य मि आहें तुजसी ॥ धन्य० ॥ ३ ॥

द०—( साश्रू )

( नाहीं गडे सौख्य घरीं राहिलें जरा, या चालीवर ) राग महाड.

प्राणप्रिया अनुचित हें काय बोलतां ॥ ऐवजि तव मम तनुहि अर्पित्यें स्वतां, अर्पित्यें स्वतां, अ-

पित्यें स्वतां ॥ ध्रु० ॥ मीच दुष्ट मजकारितां बहुत भागलां ॥ कृपा करा मजवरति न दुःख द्या मला ॥ त्वाद्दिण हा शवसमान देह जाहला ॥ शासन तें नृप मजला । देउं तत्त्वतां, देउं तत्त्वतां, देउं तत्त्वतां ॥ प्राणप्रिया० ॥

**वाद०**—प्यारा प्रेमसिंह, प्यारी लडकी, तुम दोनु इस दुनियामे बहोत उमदा इनसान हो इसमे शक नहीं है. इसवास्ते मेरे तरफ देखके हमारे उपर आपको निग्हेवान होना चाहिये. ( वजीरास ) जो गुन्हेगार शरीफ महमद है उस्को हालफिलहाल दारपर खेचनेका हुकूम करो.

**वझीर**—जैसा हुजूरका हुकूम.

**शरीफ०**—खुदावंत न्यामत यह गुन्हेगार गुन्हेकी माफी मांगता है ! तो कसूर मुवाफ होना चाहिये.

**वाद०**—अय हरामजाद, बेशहूर, गन्हार, काफर तेरेको शरम नहीं आती माफ मंगनेकी ? तेरेपर खुदाताला वखतपर मेहेरबान होगा ! मगर मेरे तरफसे कभिबी मु-

वाफी मिलनेकी नहीं. तेरेको मुवाफी बक्षके खुदाका गु-न्हेगार मे कभी न हुंगा.

शरीफ०—अयदाना प्रेमसिंह अय सतीमां इस वखत तुमारे सिवा मुजको दुसरा कोई मेहेरबान नहीं है! मे आपका लडके जैसा हुं तो इस गरिबुल वतनपर परवस्ती करके गुन्हा मुवाफ करना चाहिये. ( पाया पडतो )

प्रेम०—( स्वगत )

दिंडी.

करुनि अपराधा चरणिं शरण येई ।
न मारावें परि शास्त्र असें पाही ॥
त्यासि उपकारें नम्रची करावें ।
तरिच तो नर जगिं मूल्यतेसि पावे ॥ १ ॥

( बादशहास हात जोडून. )

"गाफिल मत रहेना बेटा" या चालीवर.

इतनी सुनो अरज मेरी । करत है तुमसे कर जो-री ॥ ध्रु० ॥ इस अमीरका जान बचावो । और सजा कुच देवो ॥ दूरदेसमे इस्कु भेजावो । ज-नम केद या देवो ॥ इतनी सुनो० ॥

**वाद०**—तुमारा बडापेट देखके मे बहोत खुष हुवा. खैर, यह गुन्हेगारको मुवाफी देना दुरस्त नहीं है. लेकीन तुमारा हुकूम मेरेसे तोडा जायगा नहीं. आछा तुम कहते हो इसवास्ते उस्को हद्दपार करनेमे आता है. क्यौं हुवाके नहीं प्रेमसिंह ?

**प्रेम०**—-गरीबके उपर बडी परवस्ती कीइ सरकार.

**वाद०**—यह तुमारे कबीले मेरी बेटी है. और तुम जमाई हो. इसवास्ते मे आपको एक प्रगना इनआम देताहूं. आप राजी होके नहीं ?

**प्रेम०**—जैसी धालीदकी मरजी.

**बाद०**—बेटा दर्शिका और प्यारा प्रेमसिंह आबमे आप दोनोको साथलेके जनानखानेमे लेजानेका इरादा रखता हूं.

**प्रेम०**—जो हुकूम.

**वाद०**—चलो.

**चोप०**—कचेरी बरखास्त मेहेरबान सलाम.

(सर्व जातात.)

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

### स्थळः—मोदपुरी, राजदरबार.

**शूरमणी**—प्रेमसिंह, आपली एकंदर हकीकत पहातां फारच विलक्षण आणि आनंदगामीही आहे. आपणास जे इतके कष्ट भोगावे लागले त्याला कारण राणी दुःशीला आणि दासी कामंदकी. ह्या संबंधांत राणीला शिक्षा झाल्यानंतर तिनें जास्त कांहीं केलें नाहीं. पण दुष्ट कामंदकी कारागृहांत असतांही तिणें आपणा सर्वांचे प्राणधनावर दरवडा घालण्याकारितां कपटाचें बीज पेरिलें. ह्या गुन्ह्याबद्दल तिला कडक शिक्षा दिली पाहिजे. कां गुरुवर्य, असेंचना?

**उग्रदर्शन**—तिला योग्य शासन झालेंच पाहिजे.

**शूर०**—कोण आहेरे बाहेर? ( दूत आल्यावर ) कामंदकीला कारागृहांतून मुस्क्या बांधून घेऊन या. ( दर्शि-

केस ) वाळे, तुझ्या सापत्न मातेच्या कृत्यानें कुळास जी काळिमा आणिली होती ती त्वां आपल्या पातिव्रत्याच्या योगानें धुऊन आमची कीर्ति धवल केलीस. आणि आपलें नांव जगांत अमर करून घेतलेंस. शाबास ! !

द०—ताता, हा आपल्या श्रीगुरूच्या आणि प्रिय पतीच्या आशीर्वादाचा प्रभाव आहे ! माझ्याच्यानें काय होणार हो तें ?

उग्र०—राजा याचें नांव सुजनत्व !

शूर०—प्रेमसिंह, आपणही आपल्या कुळाची कीर्ति सत्य वचनाचें खडतर तप करून उज्वलित केलीत.

सुमति—महाराज योग्य ह्मणतात.

प्रेम०—हें सर्व श्रीगुरूच्या आशीर्वादाचें आणि वाडवडिलांच्या पुण्याईचें फळ होय. तें पुण्य फळास आलें तेव्हांच मजकडून हें घडलें !

उग्र०—तें तर खरेंच. असो, आतां तुह्मां उभयतांस आमरणांत दुःख पडणार नाहीं. ( सुमतीस ) आपण

आजपर्यंत जें एकनिष्ठा आणि स्वामिभक्तिरूप तपोबल एकवटून ठेविलें त्याचें पूर्ण फल आपणास मिळालें ह्मणायचें?

**सुम०**—यांत काय संशय !

( इतक्यांत कामंदकीला घेऊन शिपाई येतात. )

**शूर०**—दुष्टे, काळतोंडे ! अग तुला लहानाची मोठी करून वागविलें त्याचें असें चीज केलेंसना ? मुर्खे, तुला प्रेमसिंहानें जातांना अटकेंत ठेविलें असतांही त्वां शेवटीं अति नीच कर्म करण्यास मागें पुढें कांहीं पाहिलें नाहींस आं ? आतां तुला यथायोग्य शासन दिलें पाहिजे.

**का०**—महाराज, आपणास जी हकीकत कळली आहे ती सर्व खरी आहे. प्रेमसिंह मला वश होईनात, ह्मणून म्यां दुष्टेनें त्यांच्या जिवावरच आणण्याचा प्रयत्न केला, परंतु माझे पदरीं थोडेंबहुत पुण्य शिल्लक होतें त्यामुळेंच कीं काय न कळे; तो दुष्टप्रसंग टळून सत्याधीश प्रेमराणा आणि सीतामंदोदरीसमान बाई दर्शिका यांचें दर्शन घेऊन मी या वेळीं आपणास धन्य मानून घेत आहें. महाराज, आतां ही दासी, जी शिक्षा देतील ती भोगण्यास तयार आहे !

**प्रेम०**—महाराज, हिला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे. करितां हिला देहांताशिवाय दुसरी कोणतीही शिक्षा देण्यासाठीं हा दास विनंति करीतो आहे.

**शूर०**—अशी आपली मर्जी. ( शिपायांस ) जारे आतांच्या आतां हिला हद्दपार करवा. ( जातात. )

**शूर०**—प्रेमसिंह, मी आतां जरेनें अगदीं व्यापलों आहे ! आतां माझ्याच्यानें राजशकट झेंपवत नाहीं ! आपण जामात असून सर्व गुणांनीं अलंकृत आहां, तशांतून आपण मला पुत्राच्या ठिकाणीं आहां, ह्मणून आपण आतां ह्या गादीचे स्वामी होऊन माझ्या मागें राजशकट उत्तम रीतीनें चालवावा. माझे प्रिय प्रधानही मजबरोबर बद्रिकाश्रमीं येणार आहेत. करितां सुमती, आपण त्यांच्या ठिकाणीं राहून राजाचा आणि राज्याचा संभाळ करावा.

**उ०**—उत्तम निवड झाली. आतां कालातिक्रम न करतां कार्यभाग उरकून जगन्नियंत्याची प्रार्थना करावी.

**शूर०**—फार उत्तम आहे. जशी आज्ञा.

( राज्याभिषेकाच्या समारंभाचा देखावा, नाच, पानसुपारी, शेवटीं ईश्वरप्रार्थना )

## पद.

" राग काफी. ताल तिताला "

श्रीवर वरदे जलदें ही वसुमति सजल सकर्दम हो सस्यद ही निरंतरा हो ॥ देशहि अमुचा क्षोभ-रहित अविरत निर्भय हो सुधीक हो सुचिर स्वतंत्र राहो ॥ ईश अह्मा हिन्दुजनां बुद्धिमनःशुद्धिहि दे ॥ शांतमनें नीतिपथा नित्य अह्मा अनुसरूं दे ॥ कुमति न होवो तव पदिं देवा स्थिरमति राहो दे ॥ अंगिं सदा शौर्य दे ॥ प्रसंगिं अह्मा धैर्य दे ॥ शत्रु हृदय परम अदय जालि सदय करि निर्भय ॥ धांव झडकरि सोडवि लवकरि फारचि ॥ सदया भार झाला ॥ दुर्घट परवशता ॥ कोणि न समर्थी उपयोगाला ॥ दु० ॥ तुजविण वा धनि अमुचा नच उरला ॥ दुर्घ० ॥ अंतिं सीताराम पावला ॥ सकल हिंदुजनां पूर्ण कृपें पाहो ॥ श्रीवर० १ ॥

# शुद्धिपत्र.

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| येऊन | येउन | १ | ९ |
| पुरे | पुरें | २ | १६ |
| अजुनि | अझुनी | ३ | ६ |
| नृपकुमारा | नृपकुमरा | ४ | १ |
| कांत सर्वे | कांतसर्वे | ५ | ४ |
| नाहिना | नाहींना | ६ | ४ |
| करूं | करुं | ६ | ५ |
| करुं | करूं | ७ | १८ |
| कोठून | कोठुन | ८ | १३ |
| कोठूनि | कोठुनि | ८ | १४ |
| इनती | ईनंती | १३ | ११ |
| येथून | येथुन | १४ | १४ |
| घेऊन | घेउन | १५ | १ |
| होऊन | होउन | १६ | ४ |
| स्थिति मधीं | स्थितिमधिं | १६ | १४ |

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| धंद | धंदे | ३७ | १८ |
| मारूं | मारुं | ३८ | १ |
| चालवावयाची | चालवावयाचि | ३८ | ११ |
| फसविलें | फसवीलें | ४० | ५ |
| कन्येवरि ॥ राणिनें | कन्येवरि राणिनें ॥ | ४१ | ८ |
| तीनें ॥ | तिनें ॥ | ४१ | ९ |
| देऊनि | देउनि | ४१ | ९ |
| स्नाना कारणें | स्नानाकारणें | ४१ | १३ |
| पुजारि | पूजारि | ४१ | १४ |
| भावी | भावि | ४१ | १५ |
| सरिता स्नाना | सरितास्नाना | ४२ | ४ |
| नृपास | नृपासी | ४२ | ९ |
| ई तों | इ तों | ४२ | १० |
| असे | असें | ४२ | १० |
| कीं | किं | ४२ | १२ |
| मीं | मिं | ४७ | १३ |
| हितालहिं | हिंतालहि | ५० | १३ |
| आणि | अणि | ५० | १४ |

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| निर्मयचित्ति | निर्भयचित्तीं | ५१ | ६ |
| रणीं | रणीं; | ५१ | १२ |
| सेवनीं | सेवनीं; | ५१ | १३ |
| नांतःकरणीं | नांतःकरणीं; | ५१ | १४ |
| जनिं | जनिं; | ५१ | १५ |
| नोद्रभरणीं | नोद्रभरणीं; | ५१ | १६ |
| भवनीं तें ज्याचे | भवतीं तें ज्याचे | ५२ | २ |
| मेरु | मेरू | ५२ | ३ |
| ही व | ही वा | ५२ | १० |
| ऋषि | ऋषीं; | ५२ | ११ |
| मूर्ति | मूर्ती | ५२ | १४ |
| साधावें | साधावें ॥ | ५२ | १५ |
| चमत्कृति | चमत्कृती | ५५ | १७ |
| आभार तुमचे | अभार तूमचे | ५९ | ९ |
| आम्हां | अम्हां | ५९ | १३ |
| चे | च | ६३ | १२ |
| रून | रुन | ६३ | १४ |
| कीं | किं | ६४ | १ |

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| स्वरूपाशीं | स्वरुपाशीं | ६४ | ४ |
| रतिच. | रति | ६४ | ५ |
| मध्यंतरीं | मध्यंतरिं | ६५ | ७ |
| व्हावी | व्हावि | ६५ | १३ |
| क्षण० | क्षण० ॥ | ६५ | १३ |
| मजसी | मजासि | ६५ | १४ |
| करुनि | करूनि | ६५ | १६ |
| धूर्ततेची | धूर्ततेचि | ६६ | २ |
| नापूरास | नापुरास | ६६ | ३ |
| मनिं | मनीं | ६६ | ४ |
| म्हणूनि | म्हणुनि | ६६ | १२ |
| आपुलें | अपुलें | ६७ | ३ |
| ज्ञाल्यावांचुनी | ज्ञाल्यावांचुनि | ६७ | ३ |
| काय स्त्रियांची जात दुष्ट असते पहा | हें गद्य असल्यामुळें लहान अक्षरांत लिहिलेंसें समजावें. | ७१ | १ |
| मी | मि | ७२ | ५ |
| होऊन | होइन | ७७ | १२ |

| अशुद्ध | द्धशु | पान | ओळ |
|---|---|---|---|
| रितीनें | रितिनें | ७७ | १३ |
| हेतु | हेतू | ७७ | १३ |
| पडली | पडलि | ८९ | १४ |
| असूनी | असुनी | ८८ | ९ |
| जाहल्यापासुनि । | जाहल्या । पासुनि | ८८ | १२ |
| जारिणी | जारिणि | ९० | ११ |
| फसवुनी | फसवुनि | ९० | ११ |
| चांडाळिणी | चांडाळिणि | ९१ | ४ |
| अबले वरि | अबलेवरि | ९१ | ८ |
| फसाविलें | फसवीलें | ९२ | ८ |
| प्रीति | प्रीती | ९२ | १७ |
| करूनि | करुनि | ९३ | ८ |
| देऊं | देउं | ९३ | १० |
| घालूनी | घालुनी | ९८ | १७ |
| दिसती | दिसति | १०१ | ७ |
| रूनीया | रुनीया | १०१ | १० |
| दुष्टे | दुष्टें | १०१ | ११ |
| साधियेला | साधियला | १०१ | १२ |

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| जनरीति | जनरीती | १०२ | २ |
| आणि | आणि | १०२ | १९ |
| कळून वळून | कळुनवळुन | १०४ | ३-४ |
| राहो ॥ | राहो ॥ ध्रु० ॥ | १२४ | ६ |
| सीताराम | सिताराम | १२४ | १९ |

टीपः—पान ३७ व ३८ मधील पद्यांत चार कडवीं लिहिलीं गेलीं आहेत तीं दोन समजावींत; म्हणजे जेथें ॥ २ ॥ असा दोहोंचा आंकडा आहे तेथें ॥ १ ॥ असा एकाचा पाहिजे; व ॥ ४ ॥ चे जागीं ॥ २ ॥ पाहिजे.